पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक १८ ● शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

माणसाची खरी ओळख त्याच्या अंत:करणाच्या नम्रतेने होते.




# धाड टाकणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करा!



प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला : पुण्यातील विषारी दारू दुर्घटनेनंतर संपूर्ण राज्य हादरलेले असतानाच, अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवायांचा धसका घेत सुस्त पडलेल्या अकोला राज्य उत्पादन शुल्क विभागाला अखेर जाग आली आहे. बाळापूर तालुक्यातील सातरगाव येथे धाड टाकून तब्बल ३१ लाख ९५ हजार रुपयांचा बनावट देशी दारूचा कारखाना उद्धवस्त करण्यात आला खरा; मात्र, हजारो लिटर विषारी दारू गाळणारा मुख्य मालक अन् सूत्रधार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या हातावर तुरी देऊन पसार झाल्याचे दाखवण्यात आले आहे. यासाठी बंद कारखान्यावर धाड टाकल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. कारवाई तर केली, पण आरोपीच गायब ! त्यामुळे हा उत्पादन शुल्क विभागाचा बनावट आरोपींसाठी 'संशयित बचाव' तर नाही ना ? असा थेट सवाल आता उपस्थित होत असून धाड टाकणाऱ्या अधिकाऱ्यांचीच चौकशी करण्याची जोरदार मागणी होत आहे.**

## या प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यावीत

1. शेतमालकावर थेट गुन्हा का नाहा?
2. ज्याच्या जागेत हा बेकायदेशीर उद्योग सुरू होता, त्याच्यावर तात्काळ ठोस कारवाई का झाली नाही ?
3. मुख्य सूत्रधाराचे नाव का लपवले?
4. जप्तीचा देखावा करून मुख्य मालकाला पळून जाण्याची संधी अधिकाऱ्यांनीच दिली का, असा संशय बळावत आहे. कारखाना एका रात्रीत उभा राहिला का ?
5. भल्यामोठ्या टाक्या आणि बॉटलिंग मशिनरी एका दिवसात येत नाही, मग विभागाचे गुप्तचर काय करत होते ?
6. स्थानिक अधिकारी हप्तेबाजीच्या धुंदीत होते का ?
7. कोणाच्या राजकीय किंवा प्रशासकीय आशीर्वादाने हा 'मौत का कुआँ' सुरू होता ?
8. धाड टाकणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी होणार का?
9. मुख्य आरोपी ऐनवेळी पसार कसा होतो ?
10. 'मोठे मासे' कधी गळाला लागणार?
11. स्प्रिट आणि लेबल्स पुरवणारी मोठी साखळी मोकाट का ? हा कारवाईचा बनाव की केवळ कागदी घोडा ?

### महसुलाची चोरी अन् आरोपी 'अज्ञात' कसा ?

कारखाना ज्या शेतात सुरू होता त्या शेताचा ७/१२ उतारा उपलब्ध आहे. शेड कोणाचे, रिकाम्या बाटल्या आणि स्प्रिट पुरवणारे कोण, गाड्या कोणाच्या हे सर्व सहज शोधता येण्यासारखे असतानाही राज्य उत्पादन शुल्क विभागाने मुख्य आरोपींना 'अज्ञात' दाखवण्यात आले आहे. या प्रकरणात मोठे मासे गळाला लागले असताना त्यांना सोडण्यासाठी हालचाली झाल्याचे चित्र समोर आले आहे.

### मुख्य सूत्रधार गजाआड न झाल्यास आंदोलन !

जरी निरीक्षक प्रमोद कांबळे आणि त्यांच्या भरारी पथकाने ही कारवाई केल्याचे कागदावर दाखवले असले, तरी मुख्य मालक, स्प्रिट पुरवठादार आणि त्यांना पाठीशी घालणारे 'आशीर्वाददाते' गजाआड होत नाहीत, तोपर्यंत ही कारवाई म्हणजे केवळ सरकारच्या आणि जनतेच्या डोळ्यात धूळफेक मानली जात आहे. पुण्याच्या दुर्घटनेची पुनरावृत्ती अकोल्यात घडण्याआधी या सर्व रॅकेटचा मुळासकट पर्दाफाश करण्याची गरज आहे.



मुख्य आरोपीचा बचाव की आरोपी बदलण्याची तयारी मुख्य आरोपी कोण माहित नसताना कारवाई कशी ?



३१ लाखांचा बनावट दारू कारखाना उद्धवस्त....



एफडीएच्या धडक कारवाईनंतर उत्पादन शुल्क विभागाला जाग धाड टाकणाऱ्या अधिकाऱ्यांचीच चौकशी करण्याची मागणी

### 'बॉबी' अन् 'रॉकेट'च्या नावाखाली मृत्यूचा खेळ!

सातरगाव येथील नदीकाठच्या शेतशिवारात एका कुलूपबंद पत्र्याच्या शेडमध्ये अतिशय बिनधास्तपणे हा बनावट दारूचा कारखाना सुरू होता. गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून भरारी पथकाने २३ जुलै रोजी टाकलेल्या धाडीत 'बॉबी संत्रा' आणि 'रॉकेट देशी दारू संत्रा' या ब्रँडच्या ५५ हजार प्लास्टिकच्या सीलबंद बाटल्या, ४०० लिटर विषारी मद्यार्क (स्प्रिट), ४ ड्रम, इसेंस, बॉटलिंग मशिनरी, अल्कोहोल मीटर असा ३१ लाख ९५ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

### माध्यमांना मुलाखत देताना काय सांगितले

राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक अकोला जिल्हा यांना एक इन्फॉर्मेशन मिळाली त्यांनुसार आम्ही कारवाई केलेली आहे. बाळापूर तालुक्यामध्ये सातारगाव या ठिकाणी एका ओसाड जागी एक बंद फॅक्टरी आढळून आलेली आहे. तिथे सगळे आम्ही इन्स्ट्रुमेंट जप्त केलेले आहेत. त्यात प्रामुख्याने स्पिरिट आढळून आलेलं आहे. आणि जो डुप्लिकेट माल तयार करण्यात आला होता, त्याचे ५५० कंट्री लिकरचे (म्हणजे देशी मद्याचे) बॉक्सेस आपण जप्त केलेले आहेत. समोरची कारवाई सुरू आहे आणि यामध्ये स्पिरिट सापडलं असल्यामुळे मूळ मालकापर्यंत आम्ही नक्कीच पोहोचू. यामध्ये साधारणतः ४०० लिटर स्पिरिट सापडलेलं आहे, ५५ हजार प्लास्टिकच्या सीलबंद बॉटल्स, आणि लेबल्स सापडलेले आहेत, पुठ्ठे वगैरे... या अशा पद्धतीचा ३० लाख ९० हजाराचा मुद्देमाल हा हस्तगत केलेला आहे.

- प्रमोद कांबळे निरीक्षक, भरारी पथक, राज्य उत्पादन शुल्क विभाग,अकोला

# जिल्हा कारागृह प्रशासनाचा हलगर्जीपणा; कैद्याची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या ?

प्रतिनिधी २४ जुलै



अकोला: अकोला जिल्हा कारागृहातून एक अत्यंत खळबळजनक आणि प्रशासकीय कारभाराची लक्तरे वेशीवर टांगणारी घटना समोर आली आहे. न्यायालीयन कोठडीत असलेल्या एका कैद्याने कारागृहाच्या आवारातील विहिरीत उडी मारून आत्महत्या केली आहे. अनिल ओंकार निंबोकार (वय ३५, रा. यावलखेड) असे मृत कैद्याचे नाव आहे. या धक्कादायक घटनेमुळे कारागृहातील सुरक्षेवर आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

### काय आहे पार्श्वभूमी?

मृत अनिल निंबोकार याचा विवाह १३ वर्षांपूर्वी विवाह झाला होता. त्यांना दोन लहान मुले आहेत. मात्र, चार महिन्यांपूर्वी चारित्र्याच्या संशयावरून अनिलने पत्नी वृषालीची हत्या केल्याचा आरोप होता. बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार त्याची रवानगी अकोला जिल्हा कारागृहात करण्यात आली होती. एकीकडे कौटुंबिक हत्येची पार्श्वभूमी असताना, दुसरीकडे सुरक्षेच्या नावाखाली कारागृहात सुरू असलेला हा 'गंभीर हलगर्जीपणा' कोणाच्या अंगलट येणार? दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई होणार की नेहमीप्रमाणे हे प्रकरणही दाबले जाणार? असा संतप्त सवाल आता सामान्य जनता विचारत आहे.

### अनिल च्या आईचा संतप्त सवाल

या घटनेनंतर मृत अनिल निंबोकार याची वृद्ध आई शोभा निंबा पवार यांनी पोलीस आणि कारागृह प्रशासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला आहे. शोभा पवार यांनी अत्यंत शोकाकुल आणि संतप्त वातावरणात प्रशासनाला धरून विचारले. 'माझा मुलगा अकोल्याच्या जेलात होता... तो कसा वारला, त्याच्यासोबत काय घडलं, हे पोलिसांनी आम्हाला स्पष्ट सांगावंच लागेल ! आमच्या घरात आता उरलंच कोण आहे ? तो त्याच्या बायकोच्या हत्येच्या प्रकरणात गेला होता, पण तिथं त्याचा मृत्यू कसा झाला ? या संपूर्ण प्रकरणाची 'स्पेशल पोलीस चौकशी' झालीच पाहिजे !'

# शिक्षण विभागातील आयएएस अधिकाऱ्याची केली हकालपट्टी !

**नवी दिल्ली :** पेपर लीक प्रकरण आणि जंतर-मंतरवर सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने शिक्षण मंत्रालयात मोठा प्रशासकीय फेरबदल केला आहे. उच्च शिक्षण विभागाचे सचिव विनीत जोशी यांची या पदावरून हकालपट्टी करण्यात आली. जोशी यांच्या जागी १९९४ च्या बॅचचे वरिष्ठ राजस्थान कॅडरचे आयएएस (घ्Aए) अधिकारी नरेश पाल गंगवार यांच्याकडे उच्च शिक्षण विभागाच्या नव्या सचिवपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. देशातील शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्याचे मोठे आव्हान आता गंगवार यांच्यासमोर असणार आहे. गेल्या काही दिवसांपासून ऱ्EEऊ आणि इतर परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांमुळे देशभरात गदारोळ माजला आहे. दिल्लीच्या जंतर-मंतरवर 'कॉकरोच जनता पार्टी'सह विविध विद्यार्थी संघटनांचे आंदोलन सुरू असून, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची आणि परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणण्याची मागणी लावून धरली जात आहे. या वाढत्या राजकीय आणि सामाजिक दबावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने प्रशासकीय स्तरावर ही मोठी कारवाई करत विनीत जोशींची पंचायती राज मंत्रालयात बदली केली आहे. आता देशातील ढेपाळलेली परीक्षा व्यवस्था रुळावर आणणे, विद्यार्थ्यांचा रोष शमवणे आणि शिक्षण क्षेत्रातील विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करणे हे मोठे आव्हान नव्या सचिवांसमोर असणार आहे.

# दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे होणार विलिनीकरण; नेतृत्वाच्या मुद्यावर पेच!

प्रतिनिधी २४ जुलै

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चा मागील अनेक दिवसांपासून आहे. पडद्यामागे देखील अनेक घडामोड घडत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या प्रक्रियेला वेग आला असला, तरी 'एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व नक्की कोणत्या गटाने आणि कुणी करायचे?' या मुख्य मुद्यावर विलीनीकरण रखडल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यामुळे या विलीकरणाच्या चर्चांना आणि एनडीए प्रवेशाच्या शक्यतांना अधिक बळ मिळाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही गटांच्या एकत्रीकरणानंतर पक्षाची कमान अजित पवार गटाकडे असणार की शरद पवार गटाकडे, यावर अद्याप एकमत झालेले नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एनडीएमध्ये स्वतंत्रपणे कोणत्याही नव्या पक्षाला प्रवेश देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे एनडीएमध्ये सहभागी व्हायचे असेल तर दोन्ही राष्ट्रवादींना एकत्र येऊन 'विलीनीकरण' करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असा स्पष्ट संदेश भाजपने दिला आहे.

# आषाढी एकादशीच्या निमित्ताने... श्रींचे मंदिर शुक्रवारी रात्रभर खुले!



प्रतिनिधी २४ जुलै

शेगाव: आषाढी एकादशीच्या निमित्ताने जे भाविक श्री क्षेत्र पंढरपूर येथे जाऊ न शकलेले भाविक विदर्भाचे प्रति पंढरी म्हणून ओळख असलेल्या श्री संत गजानन महाराज संस्थान शेगाव येथे दर्शन घेण्यासाठी येत असतात भाविकांची गर्दी लक्षात घेता श्री संस्थानच्या वतीने शुक्रवार रोजी श्रींचे मंदिर दर्शनार्थ रात्रभर खुले राहणार आहे. दि.२५ शनिवार रोजी आषाढी एकादशी निमित्त, मराठवाडा, जळगांव खान्देश, विदर्भातील विविध जिल्ह्यांतील हजारो भाविक श्रींच्या समाधी दर्शनासाठी येतात आषाढी एकादशी निमित्त श्रींच्या मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मंदिरामध्ये काकडा, भजन, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ व श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा निघणार आहे. रात्री ८ ते १० श्रीहरी कीर्तन होणार आहे. श्रींच्या भाविकांसाठी दि.२४ जुलैच्या रात्री आणि २५ जुलैला दिवसभर श्री मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेऊ शकतील. श्री समाधि दर्शन व श्रीमुख दर्शन, महाप्रसाद, व्यवस्था केली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवास मध्ये नियमानुसार निवास व्यवस्था नित्या प्रमाणे सुरू आहे. संपुर्ण मंदिर परिसरात स्वच्छता ही भक्तांना श्रींच्या प्रति आपली आस्था प्रसन्न मनाने भक्तिभावाने एकरूप करणारी आहे.भक्तांना कोणताही त्रास होवू नये यास्तव श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर आहेत. या आषाढी एकादशी उत्सव काळात सर्वतोपरी सोयीसुविधा संस्थानच्या वतीने पुरविल्या जात आहेत.

# पंढरीत लोटला वारकऱ्यांचा महासागर!

## दर्शनासाठी 15 ते 18 तास, 60 हजारांवर भाविक रांगेत



प्रतिनिधी २४ जुलै

पंढरपूर : पंढरपुरात आषाढी वारीनिमित्त विठ्ठल दर्शनासाठी मोठी गर्दी झाली असून, भाविकांना १५ ते १८ तास वाट पाहावी लागत आहे. दर्शनाची रांग गोपाळपूरपासून रांजणी रोडवरील इंजिनिअरिंग कॉलेजपर्यंत पोहोचली असून सुमारे ६० हजार भाविक रांगेत आहेत.पंढरपूरमध्ये सध्या आषाढी वारीनिमित्त भाविकांचा महापूर आला असून विठ्ठल दर्शनाची रांग ८ किलोमीटरपर्यंत पोहोचली आहे. वारकऱ्यांसाठी प्रसादाचे तब्बल १२ लाख बुंदी लाडू तयार करण्यात आले आहेत. पंढरीत जवळपास ८ लाख भाविक दाखल झाले आहेत. वाखरीत संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचा अंतिम गोल रिंगण सोहळा पार पडला असून पंढरीत वारकऱ्यांचा महासागर लोटला आहे. सोलापूर जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार विठ्ठल मूर्तीच्या जतनासाठी रासायनिक लेपन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील श्री विठ्ठल सभा मंडप, मंदिरातील आतील व बाहेरील बाजूस, श्री संत नामदेव पायरी या ठिकाणी तिरंग्याची आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. याशिवाय, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, श्री संत तुकाराम भवन, श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास इत्यादी ठिकाणी देखील रोषणाई करण्यात आली आहे. आषाढी एकादशीला लाखो वारकरी भक्त मोठ्या भक्तिभावाने वारी करतात. विठू नामाचा गजर करत असंख्य पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातून आणि इतर राज्यांतून पायी चालत येणाऱ्या वारकऱ्यांचा हा उत्सव विशेष प्रसिद्ध आहे.

# देशातील पहिल्या फास्ट ट्रॅक न्यायालयाची स्थापना

## न्यायमूर्ती अनु ग्रोव्हर बलिगा यांची नियुक्ती, दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय

प्रतिनिधी २४ जुलै

**नवी दिल्ली:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळलेल्यांना जलद न्याय आणि कठोर शिक्षा देण्याची वचनबद्धता जाहीर केल्यानंतर काही तासांतच, दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी नवीन सार्वजनिक परीक्षा कायदा, २०२४ (गैरप्रकार विरोधी कायदा) अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी देशातील पहिल्या विशेष फास्ट ट्रॅक न्यायालयाची स्थापना केली.

तसेच फौजदारी खटल्यांची सुनावणी करण्यासाठी न्यायमूर्ती अनु ग्रोव्हर बलिगा यांची या जलदगती न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. हे न्यायालय राऊस ॲव्हेन्यू कोर्ट्स कॉम्प्लेक्समधून कामकाज करेल, अशी देखील माहिती आहे. सरन्यायाधीश डी. के. उपाध्याय यांच्या निर्देशानुसार जारी केलेल्या या आदेशानुसार, नवीन गैरप्रकार विरोधी कायद्याअंतर्गत दाखल




झालेली सर्व प्रलंबित प्रकरणे तात्काळ या नवीन जलदगती न्यायालयात हस्तांतरित केली जातील. या विशेष न्यायालयात न्यायमूर्ती अनु ग्रोव्हर बालिगा यांची विशेष सीबीआय न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नीट, यूपीएससी, एसएससी आणि एनटीए यांसारख्या संस्थांद्वारे आयोजित परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी लागू केलेल्या या कायद्यानुसार, दोषींना ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे.

### मोदींनी सोशल मीडियाद्वारे केली घोषणा

» पंतप्रधान मोदी म्हणाले, की फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्यासाठी आणि दोषींना कठोर शिक्षा सुनिश्चित करण्यासाठी अधिकाऱ्यांनी एक मसुदा अंतिम केला असून तो त्यांना सादर केला आहे. यावर आज (शुक्रवार, २४ जुलै) मंत्रिमंडळात चर्चा होणार आहे. मंत्रिमंडळातील मंत्र्यांशी सल्लामसलत केल्यानंतर याला अंतिम स्वरूप दिले जाईल. त्यांनी सांगितले की, संसदेच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनाचा दुसरा आठवडा सोमवारपासून सुरू होत असून, संबंधित विधेयक सभागृहात लवकरात लवकर मंजूर करण्याचे प्रयत्न केले जातील.

# अखेर 26 दिवसांनंतर सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडलं!

## जे.पी. नड्डा यांची उपस्थिती

प्रतिनिधी २४ जुलै

**दिल्ली :** नीट पेपरफुटी प्रकरणातील दोषींविरुद्ध आंदोलन करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी जवळपास २६ दिवसांनंतर आपले उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. मध्यरात्री १.३० वाजता केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर सोनम वांगचुक यांनी उपोषण थांबवण्याचा निर्णय जाहीर केला. उपोषण थांबवण्याची माहिती स्वत: सोनम वांगचुक यांनी एक्सवर पोस्ट करत दिली. एकीकडे सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेतलं असलं तरी दुसरीकडे कॉकरोच जनता पार्टी अजूनही आंदोलनावर ठाम आहेत. सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी प्रतिक्रिया दिली. २६ दिवसांच्या उपोषणानंतर सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेतल्याने आम्हाला मोठा दिलासा मिळाला असून आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

## अध्यात्म आणि क्रिकेट

क्रिकेट मध्ये एका ओव्हर मध्ये चेंडू किती असतात? तर आपलं उत्तर असेल सहा. पण लक्षात घ्या. चेंडू एकच असतो..जो सहा वेळा टाकला जातो. टाकण्याचे प्रकार वेगवेगळे असतात. जसे- ऑफस्पिन-लेगस्पिन, यॉर्कर, गुगली, इन स्विंग- आऊट स्विंग, फुलटॉस आणि बाऊंसर. तसा अध्यात्मात विकार नावाचा एकच चेंडू आहे, जसं काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर तो सहा वेळा आमच्यावर अंगावर टाकला जातो. आणि आपल्या सभोवताली कॅच पकडण्यासाठी वासनांची फिल्डींग लावली जाते. अशा वेळी आपणाकडे उपासनेची, भक्तीची, श्रध्देची बॅट हातात असली पाहिजे त्या बॅटने त्याला मारता आलं पाहिजे. आणि जर तो चेंडू हुकला. तर?? अध्यात्मात जे तीन स्टंप असतात. भक्ती, ज्ञान, वैराग्य याला धक्का लागून आपण आउट होतो. आणि गुरुचा( ईश्वररूपी अंपायर) इशारा येतो तुमचं जीवन संपलं आणि हे सतत घडत राहिलं तर एकदिवस आपलं नाव अध्यात्माच्या संघातून( आयुष्यातून) कट होतं. म्हणून अध्यात्मिक क्रिकेट मध्ये *संतरुपी* कोच अर्थात मार्गदर्शक सोबत असणं अतिशय महत्वाचं असतं. एकंदरीत काय.. रन नाही निघाल्या तरी चालतील.. पण विकेट जाता कामा नये. गुरुदेव दत्त श्री स्वामी समर्थ

# प्रत्येक पंचवार्षिक मध्ये नवीन सत्ता आणल्यास भ्रष्टाचाराचा खात्मा?

नीट पेपर फुटी प्रकरणानंतर दिल्ली जंतर मंतर येथे कॉकरोच पार्टी तर्फे आंदोलन करण्यात येत आहे. यादरम्यान सामाजिक संघटनांसह वैज्ञानिक सोनम वांगचूंग यांनी सुद्धा उपोषणाचा पवित्र घेतला व विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून योग्य न्याय देण्यासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलन सुरू केले आहे, परंतु शासनातर्फे जेव्हा सोनम वांगचूंग यांना असंवेधानीक पद्धतीने डिटेंन करण्यात आल्यामुळे समर्थक विद्यार्थ्यांनी फार मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी विद्यार्थ्यांनी आंदोलन न थांबवता पुढे चालूच ठेवले. पेपर फुटी प्रकरणासारखे अनेक घटना देशभर घडत आहेत, शिक्षण व्यवस्था डगमळीस निघाली आहे, अनेक शिक्षण संस्था, शाळा व महाविद्यालय बंद करण्यात आले आहेत, अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांचा संयम सुटला असून त्यांनी आता ही शिक्षण व्यवस्था चालवणाऱ्याचा थेट राजीनामा मागितला आहे. तसेच देश चालविणारे पंतप्रधान यांचा सुद्धा राजीनामा युवा विद्यार्थ्यांनी मागितला आहे. विद्यार्थ्यांची ही मागणी तशी योग्यच आहे कारण ज्या पदावर आपण कार्यरत आहोत त्या पदाचा कारभार आपल्या कारकिर्दीत चुकीचा किंवा अयोग्य झाला असेल तर ती आपली नैतिक जबाबदारी समजून आपण तो पदभार सोडून दिला पाहिजे. आपण इतिहासात मागे वळून पाहिले असता अशा राजीनामाच्या घटना आपल्याला नेहमीच वाचायला मिळाल्या आहेत. विद्यार्थ्यांवर झालेला आंदोलनात लाठी हल्ला, गॅस व दगडफेक ह्या घटना निंदनीय आहेत. यादरम्यान पोलिसांकडून झालेल्या हल्ल्यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी व एका विद्यार्थिनीचा उपचारा दरम्यान मृत्यू सुद्धा झाल्याची घटना घडली आहे. विद्यार्थ्यांची मागणी शासनाने मान्य करावी व शिक्षण मंत्री तसेच पंतप्रधान यांनी आपली नैतिक जबाबदारी समजून राजीनामा



देऊन शिक्षण व्यवस्था अजून बळकट करावी अशी अपेक्षा भारतीय नागरिकांकडून केली जात आहे.

आज आपल्यावर आंदोलन करण्याची वेळ आली आणि आजची युवा पिढी या आंदोलनामध्ये फार ताकदीने भिडली आहे, तसे पाहिले तर पेपर फुटी प्रकरणासारख्या, देश विघातक व असविधानिक घटना भारतामध्ये मागील 12 ते 15 वर्षापासून घडल्या आहेत. परंतु उशिरा का होईना युवा पिढीला या प्रशासनाच्या वागणुकीची जाणीव झाली आणि ही सत्ता देशातून काढून टाकले पाहिजे, असा पवित्र त्यांनी उचलला. मुळात प्रशासना कडून राजीनामा घेणे किंवा देणे ही त्या नेत्याची नैतिक जबाबदारी आहे, परंतु विद्यार्थ्यांनी, आजच्या युवा पिढीने येणाऱ्या काळात अशा प्रशासनाला पुन्हा सत्तेत बसवु नये, जेणेकरून विद्यार्थ्यांवर पुन्हा अशी वेळ येणार नाही. भारतीय संविधानाने आपल्याला सत्ता निवडत असताना निवडणूक प्रक्रियेमध्ये त्याची कारकीर्द फक्त पाच वर्षाची दिली आहे. प्रत्येक पाच वर्षांनी नव्याने निवडणुका घेण्याची तरतूद संविधानात केली आहे, म्हणजेच आपल्याला प्रत्येक पंचवार्षिक मध्ये नवीन पक्षातील सत्ता निवडून द्यायची आहे. जेणेकरून प्रत्येकाला संधी मिळेल व प्रत्येक जण पुन्हा निवडून आलो पाहिजे या उद्देशाने योग्य व चांगलेच, देश हित व विकासाची कामे करेल, जेणेकरून भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार देशात भ्रष्टाचार व अशा घटना घडणार नाहीत, त्यामुळे युवापुडीने याची जाणीव ठेवून येणाऱ्या काळात प्रत्येक पंचवार्षिक मधे सत्ता बदल करावा, बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि तो भारतीय राजकारणात सुद्धा असावा याची जाणीव आज या आंदोलनातून भारतीय जनतेला या युवा पिढीने दिली आहे. खरंच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 75 वर्षाधीच भारतीय संविधान लिहिताना खूप मोठी दुरदृष्टी ठेवून हे संविधान लिहिले आहे, याचे उदाहरण बघावयास मिळते. भारतीय घटनेनुसार मतदानाचा हक्क 18 वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकाला दिला आहे, त्याचा योग्य वापर करून, येणाऱ्या पिढीने आपला योग्य नेता निवडावयाचा आहे. तसेच आजच्या युवा पिढीने मतदान करताना निवडून येणाऱ्या नेत्याचे शिक्षण, त्याची पार्श्वभूमी, अनुभव सुद्धा बघावा. भारतीय घटनेमध्ये अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या, तशीच दुरुस्ती निवडणुकीमध्ये उभ्या असलेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता असावी यासाठी सुद्धा तरतूद करावी, जेणेकरून आपल्याला योग्य नेता निवडण्यास सोपे जाईल, देशात नवीन परिवर्तन घडून येईल. शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने दिला असून नक्कीच हे परिवर्तन देश विकासाला भरभराटीला नेईल अशी अपेक्षा आहे.

प्रा. प्रज्ञानंद थोरात
मो. 9822674487

## लाळ गिळणं शरीरासाठी घातक?

सकाळी उठल्यानंतर ब्रश करण्यापूर्वी पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे की नुकसानकारक, याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम असतो. काही लोकांना वाटते की तोंडातील बॅक्टेरिया पोटात गेल्याने आजार होऊ शकतात, परंतु वैज्ञानिक संशोधन वेगळीच माहिती देते. सकाळच्या लाळेमध्ये नैसर्गिक अँटीबॅक्टेरियल गुणधर्म, पाचक एन्झाईम्स आणि शरीरासाठी उपयुक्त घटक असतात. हे घटक पचनक्रिया सुधारण्यास आणि शरीरातील जंतूंशी लढण्यास मदत करतात. जाणून घ्या सकाळी ब्रश न करता पाणी पिण्यामागील वैज्ञानिक कारणे, त्याचे फायदे आणि कोणत्या परिस्थितीत काळजी घेणे आवश्यक आहे.

अनेक लोकांना असे वाटते की ब्रश न करता पाणी प्यायल्याने तोंडात असलेले बॅक्टेरिया पोटात जातील आणि आपण आजारी पडू. परंतु, वास्तवात असे होत नाही. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनवर प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार, रात्री आपल्या तोंडात जे बॅक्टेरिया जमा होतात, ते बहुतांश अंशी 'गुड बॅक्टेरिया' (चांगले जिवाणू) असतात. जेव्हा तुम्ही पाणी पिता, तेव्हा ही लाळ आणि बॅक्टेरिया पोटात जातात. पोटातील अत्यंत तीव्र असणारे हायड्रोक्लोरिक ?सिड या बॅक्टेरियांचा नाश करते आणि शरीराला त्यांचे दुष्परिणाम होऊ देत नाही. जेव्हा ही लाळ पोटात जाते, तेव्हा ती पोटातील ॲसिडची पातळी संतुलित राखण्यास मदत करते. लाळेमध्ये जखम बरी करण्याचे आणि जंतूंचा नाश करण्याचे नैसर्गिक गुणधर्म असतात. लाळ म्हणजे केवळ पाणी नसून, ते अनेक औषधी आणि जैविक घटकांचे मिश्रण आहे. सकाळच्या पहिल्या लाळेत प्रामुख्याने खालील घटक आढळतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ ॲडव्हान्स्ड रिसर्च इन बायोलॉजिकल सायन्सेसच्या रिपोर्टनुसार. हे एक शक्तिशाली अँटी-बॅक्टेरिअल एन्झाईम आहे, जे हानिकारक जिवाणूंच्या पेशींची भिंत तोडून त्यांचा नाश करते. हे एन्झाईम्स पचनक्रिया मजबूत करतात आणि कर्बोदकांचे पचन तोंडातूनच सुरू करतात. हा एक प्रकारचा अँटीबॉडी (प्रतिकारशक्ती घटक) आहे, जो शरीराला विविध संसर्गापासून वाचवतो. यात सोडिअम, पोटॅशिअम, कॅल्शिअम आणि फॉस्फेट असतात, जे दात मजबूत ठेवण्यास मदत करतात.?

सकाळी उठल्यावर ब्रश न करता पाणी पिण्याचे ५ वैज्ञानिक फायदे जर तुम्ही सकाळी न चुकता ब्रश करण्यापूर्वी किमान १ ते २ ग्लास कोमट किंवा साधे पाणी प्यायलात, तर शरीरात खालील सकारात्मक बदल घडतात.

# "सरन्यायाधीशांचं वक्तव्य आणि संवैधानिक जबाबदारी...!"

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १२४ नुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुखाला सरन्यायाधीश म्हणतात. त्याची सर्वात महत्त्वाची व मुख्य जबाबदारी संविधानाचे आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे ही आहे.

**न्याय्य हक्कांसाठी आंदोलन व सरकारची भूमिका**

देशातील अत्यंत महत्त्वाच्या नीट परीक्षेचे पेपर फुटल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान तर झालेच पण त्यांना मानसिक व शारीरिक यातना सहन कराव्या लागल्या आणि २० च्या वर विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. त्यामुळे ही परीक्षा घेणारी मुख्य राष्ट्रीय यंत्रणा नॅशनल टेस्टिंग एजन्सी जी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत काम करते ती बरखास्त करावी, पेपरफुटीच्या प्रकरणात दोषी असलेल्यांना कठोर शिक्षा करावी, आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि देशातील शिक्षण व्यवस्था पारदर्शक, दर्जेदार व भ्रष्टाचारमुक्त व्हावी यासाठी कठोर उपाययोजना कराव्या अशा न्याय्य मागण्या घेऊन दिल्ली येथील जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीने विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू केले. या आंदोलनाला पर्यावरण शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुंग यांनी पाठिंबा देऊन त्यांनी स्वतः जंतरमंतरवर आमरण उपोषण सुरू केले. मात्र सरकारने आपल्या अहंकारी व तानाशाही वृत्तीने या आंदोलनाची कोणतीही दखल घेतली नाही.

सोनम वांगचुंग यांच्या उपोषणाच्या १९ व्या दिवशी त्यांची प्रकृती खूपच बिघडल्यामुळे दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करून सरकारने यावर तोडगा काढावा व उपोषण थांबवावे अशी मागणी करण्यात आली. उच्च न्यायालयाने सरकारला नोटीस बजावली आणि सोनम वांगचुंग यांना सर्वप्रकारची वैद्यकीय मदत तातडीने उपलब्ध करावी, कारण देशातल्या प्रत्येक नागरिकाचा जीव वाचविणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. तेव्हा सरकारला खडबडून जाग आली. परंतु सरकारने उपोषण थांबविण्यासाठी बोलणी करून तोडगा काढण्याऐवजी दिल्ली पोलिसांना आंदोलन मोडीत काढण्याचे फर्मान सोडले. त्यानुसार दिल्ली पोलिसांनी काहीही पूर्वसूचना न देता सकाळी सिव्हिल ड्रेस मध्ये येऊन सोनम वांगचुंग यांना अत्यंत निर्दयीपणे जबरदस्तीने उचलून दवाखान्यात भरती केले. यावेळी पोलिसांनी त्यांना एखाद्या दहशतवाद्यासारखी वागणूक दिली. त्यामुळे आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला.

***पोलिसांचा अमानुष लाठीचार्ज :**

सरकारच्या आदेशावरून पोलिसांनी सोनम वांगचुंग यांना दवाखान्यात भरती तर केले, पण विद्यार्थी ठामपणे जंतरमंतरवर ठाण मांडून बसले. सोनम वांगचुंग यांनी विद्यार्थी व तमाम देशातील लोकांना आवाहन केले की, माझे उपोषण सुरू राहील तुम्ही २० जुलै, २०२६ रोजी संसदेवर मोर्चा काढा. त्यानुसार देशभरातून विद्यार्थी व महिला, मुलं मुली व नागरिक लाखोच्या संख्येने जंतरमंतर उपस्थित झाले. त्यांनी दिनांक २० जुलै, २०२६ रोजी शांततेने संसद भवनाकडे मार्च काढला. मात्र पोलिसांनी विद्यार्थी युवकांना अडवून त्यांच्यावर अमानुषपणे लाठीचार्ज केला आणि अश्रुधुरांच्या फैरी झाडल्या.

या मारहाणीचे शेकडो व्हिडियो सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यातील पोलिसांच्या क्रूरतेचा आणि निरपराध विद्यार्थ्यांना बेरहमपणे खिळे लावलेल्या काठ्यांनी केलेल्या मारहाणीची दृश्ये पाहिल्यानंतर इंग्रजी राजवटीत जनरल डायरने केलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाची आठवण झाली. इतका भयंकर अत्याचार पोलिस व पक्षाच्या गुंडांनी केला. स्वतंत्र भारतात आणि संविधान व कायद्याच्या राज्यात पोलिसांचे हे कृत्य निंदनीय असून त्याची शासन प्रशासनाला तर नाहीच पण आमदार, खासदारांनाही थोडीशी तरी लाज वाटू नये, ही लोकशाहीची फार मोठी शोकांतिका आहे.

**सर्वोच्च न्यायालयात याचिका**

दिल्लीतील आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिसी अत्याचाराच्या कारवाईविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली व त्यावर वकील नरेंद्र मिश्रा यांनी आपली बाजू मांडून पोलिसी अत्याचाराची तातडीने दखल घेण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयाला केली. पण सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी त्याकडे दुर्लक्ष करून उलट "आमचा आणि तुमचा वेळ वाया घालवू नका" आणि "आम्हाला व्हिडिओ पाहण्यात रस नाही, आमच्याकडे वेळ नाही" असे स्पष्ट शब्दांत सांगून तातडीच्या सुनावणीस नकार दिला, ही बाब निश्चितच संविधानाची अवहेलना करणारी आहे.

***सरन्यायाधीशांचे बेजबाबदार वक्तव्य:***

देशातील नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी उच्च व सर्वोच्च न्यायालयावर असते. त्यामुळे पोलिसांनी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करीत असलेल्या विद्यार्थ्यांवर अमानुषपणे लाठीचार्ज केला व अश्रुधुरांच्या फैरी झाडल्या. यात शेकडो विद्यार्थी घायल झाले. काही बेशुद्ध पडले, काही मरणाच्या दारात असून एक विद्यार्थिनी शहीद झाल्याचे कळते. म्हणजे याठिकाणी सरकारने विनाकारण आंदोलन दडपून टाकण्याच्या वाईट हेतूने विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करविला, त्यामुळे संविधानाच्या अनुच्छेद २१ अन्वये आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या जगण्याच्या मूलभूत हक्काचे उल्लंघन तर झालेच पण अनुच्छेद १९ नुसार मिळालेल्या संवैधानिक हक्कांचेही उल्लंघन झालेले आहे. त्यामुळे याची तातडीने दखल घेणे ही सर्वोच्च न्यायालयाची प्राथमिक व महत्त्वाची जबाबदारी आहे. पण न्यायाधीशांनी आम्हाला वेळ नाही, व्हिडिओ पाहण्यात रस नाही असे वक्तव्य करणे पूर्णतः बेजबाबदारपणाचे व संविधान विरोधी आहे.

**अनुच्छेद ५० व शासन आणि न्यायव्यवस्था**

भारतीय संविधानाच्या भाग चार मध्ये अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये राज्य धोरणांची निदेशक तत्वे दिली असून त्यातील अनुच्छेद ५० अन्वये न्यायांगाची शासनांगापासून फारकत करण्यात आली आहे. म्हणजे न्यायव्यवस्था कोणाच्याही दबावाशिवाय, निष्पक्ष व स्वतंत्रपणे काम करू शकते. प्रशासकीय अधिकारी किंवा सरकार न्यायालयाच्या कामात अडथळा आणू शकत नाहीत. मात्र अलिकडील काळात शासनानाचा सर्वच संवैधानिक संस्थांमध्ये हस्तक्षेप वाढला असून ह्या संस्था सत्ताधाऱ्यांच्या बटिक झाल्या सारख्या वागत आहेत. त्यामुळे निवडणूक आयोग, ईडी, सीबीआय आणि न्यायव्यवस्था यांची स्वायत्तता संपुष्टात आली असून त्यांच्यावर सत्ताधाऱ्यांचा प्रभाव दिसून येतो. म्हणूनच सरन्यायाधीशांनी या याचिकेवर सुनावणी घेण्याचे टाळले असे दिसते. यावरून देशातली न्यायव्यवस्था जर शासनाच्या दबावाखाली येऊन लोकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यास असमर्थ ठरत असेल तर न्यायासाठी लोकांनी कायदा हातात घेऊन हिंसक व्हावे अशीच न्यायालयाची भूमिका दिसते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

प्रा. डॉ.एम.आर.इंगळे
सेवानिवृत्त प्रोफेसर आणि संविधान प्रचारक तथा विभागीय सचिव डाटा अकोला

# 24 तास अन् 7 दिवस स्वत:ची काळजी घेण्याचा संदेश देणारा दिवस!

आंतरराष्ट्रीय स्व-काळजी दिनाची (सेल्फ केअर डे) सुरुवात २०११ मध्ये झाली आणि तो दरवर्षी २४ जुलै रोजी साजरा केला जातो. हा दिवस दिवसाचे २४ तास आणि आठवड्याचे सातही दिवस (२४/७) स्व-काळजी घेण्याचे महत्त्व दर्शवतो. दरवर्षी, 'द ग्लोबल सेल्फ-केअर फेडरेशन' स्व-काळजीच्या भविष्याबद्दलच्या आपल्या दृष्टिकोनाला पूरक असलेल्या कृती आणि उपक्रमांना प्रेरणा देण्यासाठी जागरूकता निर्माण करते आणि सहभागाला चालना देते.

हा दिवस स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व सांगतो. २४ जुलै (२४/७) ही तारीख प्रतीकात्मक आहे, कारण स्वतःची काळजी आठवड्याचे ७ दिवस आणि २४ तास घेतली पाहिजे. २०११ मध्ये युके स्थित 'इंटरनॅशनल सेल्फ-केअर फाउंडेशन'ने याची सुरुवात केली. लोकांना निरोगी सवयी लावण्यासाठी आणि आरोग्याबाबत जागरूक करण्यासाठी. स्व-काळजीचे मार्ग दररोज योग्य आणि पौष्टिक आहार घेणे. शारीरिक स्वास्थ्यासाठी व्यायाम किंवा चालणे. मानसिक शांततेसाठी योग आणि ध्यान करणे. पुरेशी झोप घेणे आणि ताणतणाव टाळणे. जागतिक स्व-काळजी महासंघ जागतिक आरोग्य संघटनेच्या स्व-काळजी महिन्याच्या (२४ जून - २४ जुलै) आणि आंतरराष्ट्रीय स्व-काळजी दिनाच्या (२४ जुलै) आधी आणि नंतरही स्व-काळजीच्या फायद्यांवर प्रकाश टाकत आहे. हे दोन महत्त्वाचे वार्षिक जनजागृतीचे टप्पे आहेत.

स्व-काळजी म्हणजे एखाद्या व्यक्तीने, तिच्याकडे उपलब्ध असलेल्या ज्ञानाच्या आणि माहितीच्या आधारे, स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी केलेली कोणतीही कृती. गरज पडल्यास आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या सहकार्यानेही ही प्रथा अवलंबली जाऊ शकते. स्व-काळजीद्वारे स्वतःच्या आरोग्याचे आणि स्वास्थ्याचे सक्रियपणे व्यवस्थापन करण्याचे अनेक फायदे आहेत, ज्यात आरोग्यसेवा पर्यायांमधून उत्तम निवड, वैयक्तिक स्वास्थ्याची उत्तम काळजी आणि जगभरातील सरकारे व आरोग्य प्रणालींसाठी अधिक मूल्य यांचा समावेश होतो.

सकारात्मक आणि सातत्यपूर्ण स्व-काळजीच्या



## आज आंतरराष्ट्रीय स्व-काळजी दिवस

**४.३ अब्ज लोकांना अत्यावश्यक आरोग्य सेवांचा अपुरा लाभ मिळतो.**

जागतिक स्तरावर अंदाजे १ कोटी आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता आहे, जी प्रामुख्याने कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये आहे. जगाच्या लोकसंख्येपैकी पाचपैकी एक व्यक्ती मानवतावादी संकटात जगत आहे, ज्या दरम्यान आरोग्य यंत्रणांना अत्यावश्यक सेवा पुरवण्यासाठी विशेष आव्हानांचा सामना करावा लागतो. कोविड-१९ सारख्या जागतिक महामारी, सशस्त्र संघर्ष आणि हवामान बदल यांमुळे जगभरातील आरोग्य सेवांमध्ये व्यत्यय येत आहे आणि त्यांच्यावर ताण येत आहे. स्व-काळजीचे उपाय लोकांना निवड करण्याची आणि त्यांना हव्या त्या ठिकाणी व हव्या त्या वेळी आरोग्यसेवा मिळवण्याची मुभा देतात. स्व-काळजीचे उपाय आरोग्य प्रणालींची जागा घेत नाहीत, उलट ते तिला अधिक सक्षम करतात. ते आरोग्यसेवेच्या एका समग्र दृष्टिकोनाचा भाग आहेत, जो प्राथमिक आरोग्यसेवेत सुधारणा करतो आणि सार्वत्रिक आरोग्य व्याप्तीसाठी योगदान देतो.

पद्धतींचा अवलंब केल्याशिवाय आपण महामारीतून सावरू शकत नाही. म्हणूनच, या वर्षीची 'लवचिकता' ही संकल्पना तुम्हाला कोविड-१९ मधून शिकलेले धडे घेऊन जागतिक स्व-काळजीच्या कृतींना पाठिंबा देण्यासाठी एक नवीन वचनबद्धता करण्यास सांगत आहे. व्यक्तींना सक्षम करणाऱ्या आणि उत्तम आरोग्य परिणामांसाठी जागरूकता वाढवणाऱ्या बदलाची मागणी करताना, आपण एकत्र येऊन आपला आवाज अधिक बुलंद करू शकतो.

गेल्या वर्षी आम्ही एक हजार लोकांना, स्वतःची, आपल्या समाजाची आणि आरोग्य व्यवस्थेची अधिक चांगली काळजी घेण्यासाठी त्या वर्षी ते काय करतील याबद्दल 'स्व-काळजीची प्रतिज्ञा' देण्यासाठी आमच्यात सामील होण्यास प्रेरित केले. जगभरातील लोक एकत्र आले आणि त्यांनी आम्हाला एक खरा समुदाय तयार करण्यास मदत केली. पण काम इथेच थांबत नाही, खरा बदल घडवण्यासाठी आपल्याला धोरणात्मक चौकट अधिक मजबूत करणे आवश्यक आहे, जेणेकरून ती स्व-काळजीला पूर्णपणे पाठिंबा देईल. जीएससीएफच्या महासंचालिका, जुडी स्टेनमार्क, स्वतःचे काळजी घेण्याचे वचन देत आहेत आणि इतरांनाही एका निरोगी भविष्यासाठीच्या प्रतिज्ञेत सामील होण्याचे आवाहन करत आहेत.

२४ जूनपासून 'स्व-काळजी महिन्या'ची सुरुवात होते, ज्याची सांगता २४ जुलै रोजी 'स्व-काळजी दिना'ने होते. हा प्रतिकात्मक दिवस निवडण्यात आला. स्व-काळजी आणि स्व-काळजी उपायांबद्दल अतिरिक्त जागरूकता निर्माण करणे. त्यांच्यामुळे लोकांच्या जीवनात येणाऱ्या फायद्यांचा आणि आतापर्यंत जे काही साध्य झाले आहे त्याचा उत्सव साजरा करा. आरोग्य प्रणालींमध्ये स्व-काळजी उपायांचा समावेश करण्यासाठी त्यांचा विस्तार करण्याकरिता नवीन वचनबद्धता आणि कृतीचे आवाहन. या महिन्यादरम्यान, जगभरातील लोक स्व-काळजीच्या पद्धती आणि उपायांचा, तसेच त्यामुळे प्रत्येकाच्या जीवनात होऊ शकणाऱ्या बदलाचा उत्सव साजरा करतील.

**स्वतःची काळजी घेणे म्हणजे काय?**

जागतिक आरोग्य संघटनेच्या व्याख्येनुसार, स्व-काळजी म्हणजे व्यक्ती, कुटुंबे आणि समुदाय यांनी आरोग्य कर्मचाऱ्याच्या मदतीने किंवा मदतीशिवाय स्वतःच्या आरोग्याला प्रोत्साहन देणे व ते टिकवून ठेवणे, आजारांना प्रतिबंध करणे आणि आजारपण व अपंगत्वाचा सामना करणे.

..............

**मी स्व-काळजीच्या उपायांबद्दल ऐकले आहे, ते काय आहेत?**

स्व-काळजी हस्तक्षेप ही पुरावा-आधारित साधने आहेत जी स्व-काळजीस समर्थन देतात. यामध्ये औषधे, समुपदेशन, निदान किट्स आणि डिजिटल तंत्रज्ञान यांचा समावेश होतो. अधिकाधिक साधने विकसित होत असल्याने हा एक रोमांचक काळ आहे.

............

**स्वतःची काळजी घेणे इतके महत्त्वाचे का आहे?**

स्व-काळजी म्हणजे लोकांना त्यांच्या स्वतःच्या आरोग्यसेवेमध्ये सक्रिय भूमिका बजावण्यासाठी सक्षम करणे. असे केल्याने केवळ लोक स्वतःच्या आरोग्यसेवेच्या केंद्रस्थानी येतात असे नाही, तर आरोग्य यंत्रणांवरील ताणही कमी होतो.

## हुंड्याचे समाजशास्त्र उच्चशिक्षित झालात; पण विचार बदलले का?

आज मुलाचे शिक्षण आणि नोकरी ही त्याची गुणवत्ता न राहता आर्थिक व्यवहाराचे साधन बनते. त्यांच्या शिक्षणासाठी झालेला खर्च आणि दिलेला वेळ व श्रम हा हुंड्याच्या माध्यमातून वसूल करण्यावर भर देण्यात येतो. याचा सर्वाधिक फटका मुलींच्या कुटुंबाला बसतो. अनेक पालक मुलीच्या विवाहासाठी कर्ज काढतात, शेती विकतात. आयुष्यभराची बचत खर्च करतात किंवा निवृत्तीचे पैसे वापरतात. काही कुटुंबे आर्थिक संकटात सापडतात.

विवाहानंतरही मागण्या थांबत नाहीत. मानसिक छळ, शारीरिक अत्याचार, आत्महत्या किंवा संशयास्पद मृत्यूच्या घटना आजही घडतात. त्यामुळे हुंडा हा केवळ विवाहाचा विषय नाही; तो महिलांच्या मानवी हक्कांचा आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे.समाजशास्त्रात 'ज्ञान आणि आचरणातील सुसंगती' हे महत्त्वाचे मूल्य मानले जाते. शिक्षक, प्राध्यापक आणि समाजपरिवर्तनाची भाषा बोलणाऱ्या व्यक्तींकडून समाजाला अधिक अपेक्षा असतात. म्हणूनच जेव्हा अनेकजण मानव विज्ञान आणि विविध विद्याशाखेतील विषय जसे समाजशास्त्र, समाजकार्य, मराठी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, विधी यांसारखे विषयांचे शिक्षण घेतात किंवा ते शिकवतात. त्यांमध्ये संशोधन करतात, त्या आधारे खाजगी आणि शासकीय नोकऱ्या प्राप्त करतात, व्यवसाय करतात. तेव्हा त्यांमध्ये काही मानवी मूल्ये रुजली की नाही असा प्रश्न पडतो.

विज्ञान - तंत्रज्ञान यांसारख्या विषयांचे शिक्षण घेतलेले अनेक उच्चशिक्षित सुद्धा आपल्या जीवनात वैज्ञानिक दृष्टीकोन न स्वीकारता हुंड्यासारख्या अमानुष परंपरेचे स्वतःच्या स्वार्थासाठी पालन करतात. रूढीवादाचे समर्थन करतात.

उच्चशिक्षित व्यक्ती जी कोणत्याही विषयात शिक्षण घेतलेली असो ती व्यवहारात हुंडा घेण्याची कृती करीत असेल तर ती निश्चितच आदरास पात्र होऊ शकत नाही. कारण अशी व्यक्ती सामाजिक शास्त्र आणि विज्ञानाचे कितीही ज्ञान प्राप्त केलेली असो तिचा व्यवहार हा विषमतेचा असेल तर ती उपेक्षेस पात्र आहे. आज हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आहे.

परंतु कायद्याची भीती पुरेशी नाही. समाजातील नैतिकता, वैचारिक प्रामाणिकता आणि वैयक्तिक आचरण बदलल्याशिवाय ही प्रथा पूर्णपणे नष्ट होणार नाही. या लेखाचा उद्देश कोणत्याही व्यवसायाची किंवा संपूर्ण उच्चशिक्षित वर्गाची बदनामी करणे नाही. आजही हुंडामुक्त विवाह करून आदर्श निर्माण करत आहेत. त्यांचा सन्मानच झाला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी विचार आणि कृती यांच्यात विसंगती आहे, त्या विसंगतीकडे लक्ष वेधणे ही सामाजिक जबाबदारी आहे. आज गरज आहे.

प्रफुल्ल मंदा श्रीधर
सामाजिक कार्यकर्ता/जिल्हा कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती.
मो. 9665185428

३
सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# काटेपूर्णा प्रकल्प क्षेत्रात 24 तासांत 2 मि.मी. पाऊस



## पाणलोट क्षेत्र अजूनही कोरडेच

प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला** : जिल्ह्यात दोन दिवसांत काही ठिकाणी रिमझिम तर काही भागांत जोरदार पाऊस झाला.

काटेपूर्णा धरण परिसर आणि पाणलोट क्षेत्रात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे धरणांतील जलसाठा वाढीची अपेक्षा अपुरीच ठरत आहे. पाटबंधारे विभागाच्या अहवालानुसार, अकोला शहराची तहान भागविणाऱ्या काटेपूर्णा धरण परिसरात गुरुवारी सकाळी ८ वाजेपर्यंत गत २४ तासांत केवळ २ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. आतापर्यंत वाण धरण परिसरात १३ मिलिमीटर पाऊस झाला. मध्यम प्रकल्पांमध्ये पातूर तालुक्यातील निर्गुणा धरण परिसरात गत २४ तासांत तसेच हंगामात अद्यापही पावसाची नोंद झालेली नाही. मोर्णा धरण परिसरात २४ तासांत ९ मिलिमीटर, तर हंगामात ३०१ मिलिमीटर पाऊस झाला आहे. मूर्तिजापूर तालुक्यातील उमा धरण क्षेत्रात २४ तासांत १० मिलिमीटर आणि आतापर्यंत ६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. धरणांमध्ये पाण्याची आवक वाढण्यासाठी पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस होणे आवश्यक असते; मात्र जिल्ह्याच्या काही भागांत पाऊस पडत असला तरी धरण परिसरात अपेक्षित पर्जन्य होत नसल्याने जलसाठा वाढीचा वेग मंदावला आहे. त्यामुळे आगामी काळातील पाणी उपलब्धतेबाबत चिंता कायम असून, धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

जिल्ह्यातील दोन मोठ्या धरणांमध्ये २९.३७ टक्के, चार मध्यम प्रकल्पांमध्ये २४.६६ टक्के आणि २४ लघु प्रकल्पांमध्ये २८.५५ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. एकूण ३० प्रकल्पांमध्ये २७.८७ टक्के जलसाठा असून, काटेपूर्णा धरणात केवळ १७.३९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

गेल्या २४ तासांत अकोला जिल्ह्यात सरासरी ८.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. सर्वाधिक ९.७ मिलिमीटर पाऊस अकोला तालुक्यात, तर ८.२ मिलिमीटर पाऊस बार्शीटाकळी तालुक्यात नोंदविण्यात आला.

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची आढावा सभा

## नवनियुक्त केंद्र समन्वयकांचा सत्कार



प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या अकोला तालुका शाखेची आढावा सभा हॉटेल वेलकम इन अकोला येथे २१ जुलै रोजी संपन्न झाली. सभेचे अध्यक्षस्थानी नामदेवराव फाले (माजी जिल्हाधक्ष शिक्षक समिती) होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अरविंद गाडगे आणि चरणदास तरोळे, प्रमुख उपस्थिती मध्ये गोपाल सुरे (विभागीय उपाध्यक्ष अमरावती विभाग महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती), सौ गीताबाली उनवणे (राज्य प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती), शिवानी जोशी (महिला जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती अकोला) यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सभेमध्ये सभासद नोंदणी करून संघटन बळकट करणे, तालुकास्तरीय अधिवेशनाबाबत नियोजन करणे आणि अकोला तालुक्यातील शिक्षकांच्या समस्या सोडवणे या विषयावर चर्चा झाली.

यावेळी अकोला तालुक्यातील सर्व नवनियुक्त केंद्रप्रमुख यांचा शाल व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सौ देवांगणा व श्रीकृष्ण गावंडे यांचा शिक्षण क्षेत्रात निस्वार्थ आणि उल्लेखनीय सेवेबाबत सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर शिक्षक समितीमध्ये दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल नामदेवराव फाले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सोबतच उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल अकोला पंचायत समितीमध्ये कार्यरत उपस्थित सर्व केंद्रप्रमुख यांचा सत्कार शाल व भेटवस्तू देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. सभेचे प्रास्ताविक विकास राठोड (तालुका अध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा अकोला) यांनी केले. मंगेश देशपांडे यांनी आजवरच्या समितीच्या कार्याचा आढावा सभेपुढे मांडला. सभेचे सूत्रसंचालन निलेश कवडे (तालुका सरचिटणीस महाराष्ट्रात राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा अकोला) यांनी तर आभार प्रदर्शन नीता बिडवे यांनी केले. यावेळी मंगेश देशपांडे, राजीव हेलगे, प्रशांत वासनकर, नंदकिशोर इंगळे,शाम राऊत, उमेश लगड, प्रभाकर ठाकरे,,सीमा धार्मिक, कु नीता जाधव, अश्विनी गावंडे, तृप्ती देशपांडे, केशव साखरकर ,राजेंद्र तरोळे, धनराज ठाकरे ,रवींद्र धोत्रे,उमेश दहिभात,संजय मालवे ,विजय वाकोडे , शिवाजी थोरात , मनीष गुजरकर ,धीरज यादव, हर्षा शेलकर , सुरेश ठाकरे, दीपक खारोडे, धनेश्वर साबळे, मीनाक्षी आपोतीकर, विजय बोरसे, आरती साबळे, प्रतिभा जोशी, वैशाली टेकाडे , साधना चव्हाण , श्वेता दुतोंडे, सुनील देशपांडे, संजय कलोरे , प्रियंका ढाकरे, शारदा भाकरे, प्रिया आदमाने, नंदिनी पवार, चंद्रशेखर चतारे, नेहा देशपांडे, मेघा बुलबुले , कृपाली बोधनकर, पूनम बहाकर, रेणुका चौधरी, अनिता तरोळे, नलिनी गाडगे, केशव उमाळे यांच्यासह बहुसंख्या शिक्षक बंधू आणि भगिनींची उपस्थिती होती.

# चंदाताई शर्मा यांची महाराष्ट्र प्रदेश भाजपा महिला आघाडीच्या सचिवपदी निवड

प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला** : महाराष्ट्र प्रदेश भाजपा महिला आघाडीच्या सचिवपदी सौ. चंदाताई शर्मा यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीची घोषणा आमदार व प्रदेशाध्यक्षा सौ. चित्राताई वाघ यांनी केली.



प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संघटन उपाध्यक्ष उपेंद्र कोठेकर, विधिमंडळ प्रतोद आमदार रणधीर सावरकर, प्रदेश सरचिटणीस आमदार संजय कुटे, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, जयंत मसने यांच्याशी चर्चा करून चंदाताई शर्मा यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

चंदाताई शर्मा यांनी यापूर्वी दोन वेळा भाजपा महिला मोर्चा महानगर अध्यक्ष म्हणून पद भूषवले आहे. तसेच स्वीकृत नगरसेवक म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात त्या सातत्याने अग्रेसर राहिल्या आहेत. अनेक सामाजिक संघटनांशी त्यांचा जवळचा संबंध आहे. या निवडीबद्दल _भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. वैशालीताई शेळके, महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर_ यांच्यासह सर्व नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. चंदाताई शर्मा यांनी यशाचे श्रेय महिला आघाडीच्या नेत्या सौ. सुहासिनीताई धोत्रे, श्रीमती गंगादेवी शर्मा, सौ. मंजुषाताई सावरकर व सर्व सहकाऱ्यांना दिले आहे. महिला आघाडीच्या कार्याला वेग देण्याच्या दृष्टीने प्रदेश पातळीवर नविन नियुक्तया करण्यात येत आहेत. त्याचाच हा एक भाग आहे.

# पातूर पोलिसांची धडक कारवाई

## गोवंशीय जनावरांची सुटका; दोन वाहने जप्त, तिघांवर गुन्हा

**पातूर** : पातूर पोलिसांनी 'प्रहार ऑपरेशन' अंतर्गत गुरुवारी (दि. २३ जुलै) केलेल्या धडक कारवाईत कत्तलीच्या उद्देशाने क्रूरतेने वाहतूक करण्यात येत असलेल्या ५ गोवंशीय बैलांची सुटका केली. या कारवाईत दोन वाहने जप्त करण्यात आली असून तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पातूर पोलीस ठाण्याच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे शहरातील उड्डू स्कूल क्रमांक २ परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी एका बोलेरो पिकअप आणि एका तर्बो कंपनीच्या वाहनातून गोवंशीय जनावरांची कत्तलीच्या उद्देशाने अमानुषपणे वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून ५ गोवंशीय बैलांची सुटका केली.

या कारवाईत दोन वाहने व ५ गोवंशीय बैल असा एकूण ९ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी तीन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ मधील कलम ५, ५अ, ९अ व ९, प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० मधील कलम ११(१)(ल) तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुहास गोसावी करीत आहेत.

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा काँग्रेसकडून तीव्र निषेध

वि. प्रतिनिधी २४ जुलै

**अकोट** : दिल्ली येथे नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थिनी व महिलांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ अकोट शहर काँग्रेस कमिटी आणि अकोट तालुका काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे निषेध आंदोलन करण्यात आले.



या आंदोलनात काँग्रेसच्या पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांच्या लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर बलप्रयोग करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव ॲड. महेश गणगणे, प्रदेश सचिव प्रशांत पाचडे, अकोट शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सारंग मालाणी, अकोट तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अनोख राहणे, अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीचे महासचिव मुकुंद पांडे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. प्रमोद चोरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. तसेच माजी नगरसेवक सतीश हाडोळे, सरचिटणीस संजय आठवले, गजानन डाफे, नगरसेवक अजहर भाई, परवेज भाई, खाजा भाई, अचल बेलसरे, बादल अहीर, माजी नगरसेवक अफजल भाई, अब्दुल मुबारक, वैभव पाचडे, मिलिंद नितोने, रोशन चिंचोलकर, निखिल झाडे, सागर तेलगोटे, नितीन तेलगोटे, अब्दुल कलीम, विशाल राठोड, केशव हेड, विठ्ठल नहाटे, हैदर अली, अहमद भाई, नुसरत भाई, मैफूज खान, आसिफ ठेकेदार, नागोराव केदार, बाळूभाऊ भास्कर, पप्पू ठेकेदार, गवते आदींसह काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# कारगिल विजय दिनी शहिदांना श्रद्धांजली

**अकोला** : भारतीय माजी सैनिक संघटना अकोला जिल्ह्याच्या वतीने 26 जुलै रोजी सकाळी 10 वाजता हुतात्मा स्मारक नेहरू पार्क जवळ अकोला येथे संघटनेचे अध्यक्ष सुभेदार विष्णू डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली कारगिल युद्धात शहीद झालेले वीर सैनिकांना भावपूर्ण श्रद्धांजली देण्यात येईल. सर्व वीर माता, वीर पिता, वीर पत्नी, माजी सैनिक यांनी श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात उपस्थित राहावे. 26 जुलै रोजी होणारी आमसभा याच कार्यक्रमांमध्ये समाविष्ट केले जाईल असे भारतीय माजी सैनिक संघटना जिल्हा अध्यक्ष सुभेदार विष्णू डोंगरे यांनी कळवले आहे.

# पावसाळ्यात पालकांनी आपल्या पाल्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी – डॉ. बाबन राठोड

प्रतिनिधी २४ जुलै

**मुर्तीजापूर** : मुर्तीजापुर तालुक्यातील मोठ्या प्रमाणात लहान मुलं आजारी पडत आहे पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असून या काळात मोठ्या प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे लहान मुलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. डासांमुळे विविध आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन बालरोग तज्ज्ञ डॉ. बाबन राठोड यांनी केले आहे.



पावसाळ्यात उघड्यावर विक्री होणारे खाद्यपदार्थ खाणे टाळावे. असे पदार्थ आरोग्यासाठी घातक ठरू शकतात. तसेच नळाद्वारे येणारे पाणी उकळून व थंड करूनच प्यावे. मुलांना स्वच्छ व पूर्ण अंग झाकणारे कपडे परिधान करावेत, जेणेकरून डासांचा चावा होणार नाही. घराच्या परिसरात पाणी साचणार नाही, याचीही पालकांनी काळजी घ्यावी. पावसाळ्यात मुलांना ताप, सर्दी, खोकला, उलट्या-जुलाब किंवा इतर कोणतीही आरोग्यविषयक लक्षणे आढळल्यास पालकांनी दुर्लक्ष न करता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. पावसाळ्यातील आजारांपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी स्वच्छता, सुरक्षित पाणी आणि योग्य आहार याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, असेही डॉ. बाबन राठोड यांनी सांगितले.

# दोन गोवंशांना जीवदान, 2.22 लाखांचा मुद्देमाल जप्त

वि. प्रतिनिधी २४ जुलै

**अकोट** : जिल्हा पोलिसांच्या "ऑपरेशन प्रहार" मोहिमेअंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी बुधवारी दोन स्वतंत्र कारवाया करत कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या दोन गोवंशांची सुटका केली तसेच ६० किलो गोवंश मांस जप्त केले. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण २ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ग्रामीण पोलीस स्टेशनचे पथक परिसरात गस्त घालत असताना माहिती मिळाली की, अंजनगाव रोडवरून अकोटकडे टाटा एस वाहनातून गोवंश जातीचे बैल कत्तलीसाठी नेले जात आहेत. या माहितीच्या आधारे दिवठाणा फाटा येथे नाकाबंदी करण्यात आली. यावेळी एमएच-०१-एलए-४९२८ क्रमांकाचे टाटा एस वाहन अडवून तपासणी केली असता त्यामध्ये दोन गोवंश जातीचे बैल आढळून आले.



वाहन चालक मोहम्मद अर्सलान नूर मोहम्मद (वय २२, रा. जुने बसस्टँडजवळ, बुधवारा, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) याच्याकडे जनावरांच्या वाहतुकीसंदर्भातील कोणतीही वैध कागदपत्रे आढळून आली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी दोन गोवंश जातीचे बैल (किंमत ६० हजार रुपये) व टाटा एस वाहन (किंमत १ लाख ५० हजार रुपये) असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम, प्राण्यांना क्रूरतेने वागविणे प्रतिबंधक कायदा, भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दुसऱ्या कारवाईत पोलीस पथक ग्राम रूईखेड बिट परिसरात गस्त घालत असताना अकोलखेड येथे गोवंश मांस विक्रीसाठी नेले जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार मध्यवर्ती बँक परिसरातील कुरेशी रोडवर नाकाबंदी करून संशयिताची तपासणी करण्यात आली. यावेळी शेख शरीफ शेख हुसेन याच्याकडील पांढऱ्या रंगाच्या पोत्यामध्ये गोवंश जातीचे सुमारे ६० किलो मांस आढळून आले. पोलिसांनी १२ हजार रुपये किमतीचे मांस जप्त करून आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यांन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशान्वये, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुठ्ठे, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत उज्जैनकर, एएसआय वासुदेव ठोसरे, पोहेकॉ सागर नागे, विठ्ठल चव्हाण, भास्कर सांगळे तसेच पोलीस कर्मचारी गोपाल जाधव, शुभम लुंगे व शैलेश जाधव यांनी सहभाग घेतला.

# देवाभाऊ कृषी माऊली सन्मान सोहळा 100 महिला शेतकऱ्यांचा सत्कार व मार्गदर्शन

प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला** : महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी "देवा भाऊ" फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त अकोला भाजपा महिला मोर्चा तर्फे शेतातील, अंगणातील आणि छतावरील भाजीपाला लागवड करणाऱ्या महिलांचा `देवाभाऊ कृषी माऊली सन्मान सोहळा` मोठ्या उत्साहात झाला. या उपक्रमाचा उद्देश महिलांना नैसर्गिक व विषमुक्त भाजीपाला उत्पादनासाठी प्रोत्साहित करणे हा होता.

या कार्यक्रमात शेती, अंगण आणि छतावर भाजीपाला लागवड करणाऱ्या 100 पेक्षा जास्त "कृषी माऊली"* भगिनींचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. सुहासिनीताई धोत्रे होत्या. यावेळी सौ. मंजुषाताई सावरकर, आमदार रणधीर सावरकर, भाजपा महानगर अध्यक्ष जयंतराव मसने, सभापती विजय अग्रवाल, महापौर सौ. शारदाताई खेडकर, सौ. अर्चनाताई शर्मा, सौ. सीमाताई मांगटे-



पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा सौ. वैशालीताई शेळके, सौ. चंदाताई शर्मा, सौ. सुनिताताई अग्रवाल, आयटी सेल प्रमुख सौ. ऋचा शहा, सरचिटणीस सौ. रुपाली काकडे, महिला व बाल कल्याण सभापती सौ. आरती घोगलिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

### तज्ञ मार्गदर्शन व प्रात्यक्षिक

कार्यक्रमाचे मार्गदर्शक _पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, KVK चे फलोद्यान तज्ञ श्री. गजाननजी तुपकर_ यांनी महिलांना शेती, भाजीपाला लागवड तसेच बिना फवारणीचे छतावर/अंगणात भाजीपाला कसा लावावा या विषयावर मार्गदर्शन केले.

आमदार रणधीर भाऊ सा रकर म्हणाले, "आजच्या महिला आणि मुली सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत. घर, शेती आणि समाज या तिन्ही ठिकाणी महिला शक्ती आपलं कर्तृत्व सिद्ध करत आहे. अशा कृषी माऊलींचा सत्कार म्हणजे खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीचा सन्मान आहे." सौ. सुहासिनीताई धोत्रे म्हणाल्या,"पूर्वी प्रत्येक घराच्या अंगणात भाजीपाला असायचा. तो किती पौष्टिक आणि आरोग्यदायी होता. आज आपण आहारात अमृत घेतोय की विष हे आपणच ठरवायचं आहे. म्हणूनच प्रत्येक महिलेने किचन गार्डन करावं असं आवाहन मी करते." सौ. वैशालीताई शेळके यांनी प्रास्ताविक केले. सौ. चंदाताई शर्मा यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. देवा भाऊ फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लाडक्या बहिणींच्या वतीने अभिष्टचिंतन करण्यात आले. तसेच माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त, चंद्रशेखर आझाद व लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेविका तथा झोन सभापती सौ. रश्मीताई अवचार आणि नगरसेविका सौ. सोनालीताई अंधारे यांनी केले. आभार प्रदर्शन सौ. प्राची काकडे यांनी मानले.

# राष्ट्रवादीच्या वतीने स्व. अजितदादा यांची जयंती साजरी

**हिवरखेड** : येथील जिल्हा परिषद महात्मा गांधी शाळे समोरील राष्ट्रवादी जनसंपर्क कार्यालयात माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. दादांच्या स्मृतीला अभिवादन करण्यात आले. तसेच त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला.




# प्रा. देवेंद्र देशमुख यांचा संगीतमय भक्ती सुमने कार्यक्रम



**अकोला** : स्थानिक तरुणाई फाउंडेशन कुटासा व स्वरांजली संगीत महाविद्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रा. देवेंद्र देशमुख आणि संच यांचा संगीतमय भक्ती सु मणे या आषाढी वारी विठ्ठल नामाचा गजर या भक्तिमय अभंगाचा अभंग गायनाचा सांस्कृतिक महोत्सव खास अकोले करांसाठी शनिवार दिनांक 25 जुलै रोजी संध्याकाळी सहा ते दहा वाजे दरम्यान श्री संताजी नगर येतील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात आयोजित करण्यात आला असून या भक्तिमय संगीतमय अभंगवाणीचा लाभ घेण्याचे आव्हान आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### शहीद खा किफायत खा



**अडगाव बु.** : येथील तंटामुक्ती अध्यक्ष शहीदखॉ किफायत खॉ ५८, यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली असा आप्त परिवार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## 26 जुलैला 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर'

प्रतिनिधी २४ जुलै

**उमरखेड :** महसूल उपविभागाच्या वतीने 26 जुलैला सकाळी 10 वाजता स्थानिक राजस्थानी भवन येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात विविध शासकीय विभागांच्या सेवा व योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार किसन वानखेडे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी विकास मीना उपस्थित राहणार आहेत. शिबिरामध्ये शेतकरी दर्जा प्रमाणपत्र, गावठाण स्वामित्व सनद, 'जिवंत सातबारा' अभियान, अतिक्रमण नियमितीकरण, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, महिलांसाठी विविध योजनांची नोंदणी, नोंदणी शुल्क माफी, तसेच जात, उत्पन्न, रहिवासी आदी दाखले व प्रमाणपत्रांसह विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. सर्व शासकीय विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी आणि एकाच दिवशी उपलब्ध होणार असल्याने नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उमरखेडचे तहसीलदार आर. यू. सुरडकर यांनी केले.

# राहुल गांधींच्या अटकेचा निषेध; युवक काँग्रेसचा रास्ता रोको

### नीट पेपरफुटी, विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जप्रकरणी केंद्रावर टीका

प्रतिनिधी २४ जुलै

**यवतमाळ :** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना अटक करण्यात आल्याच्या निषेधार्थ तसेच नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी, दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जाचा निषेध आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने गुरुवारी दर्डा नाका येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक प्रमोद बगाडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली. काही काळ वाहतूक विस्कळीत झाल्याने परिसरात पोलिसांनी बंदोबस्त वाढविला. आंदोलनात प्रदेश युवक काँग्रेसच्या सचिव आयुषी देशमुख, सोशल मीडिया काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, भगवान पंडागळे, अमित पवार, प्रा. डॉ. आकाश धांदे, अक्षय राऊत, शाहरुख खान, अमेय घोडे, शुभम शेंडे, इरफान पठाण, इम्रान पठाण, सुजित मानकामे, रितेश रोकडे, अनिकेत जीवतोडे, पवन जाधव, हितेश इंगोले, अथर्व भोयर, अभिषेक बगाडे, हिम्मत ठाकरे, बादल उले, सुमेध भोयर, पवन कसार, गंदर्व नटे, दादू भगत, धैर्य कळसाईत, ऋषिकेश माडूरवार, सौरभ हजारे, प्रतीक नारलावार, रोशन शाहकार, अर्पित शेरेकर, दत्ता हाडके, अमित राठोड यांच्यासह युवक काँग्रेस व काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले.

यावेळी प्रमोद बगाडे म्हणाले, "देशात लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम सुरू आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावरील कारवाई ही विरोधी आवाज दडपण्याचा प्रयत्न आहे. नीट परीक्षा पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असून, न्यायासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणे निंदनीय आहे. या घटनांची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा. विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्यात युवक काँग्रेस कायम त्यांच्या पाठीशी राहील." दरम्यान, आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला असला तरी पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. युवक काँग्रेसने आपल्या मागण्यांवर केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला.





# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ पश्चाताप आंदोलन

### नगरपालिका प्रवेशद्वारासमोर ठिय्या; केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी

प्रतिनिधी २४ जुलै

**उमरखेड :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या पेपरफुटीविरोधी आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ गुरुवारी (दि. 23) उमरखेड नगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर विविध क्षेत्रातील नागरिक व विद्यार्थ्यांनी 'पश्चाताप ठिय्या आंदोलन' केले.

आंदोलनकर्त्यांनी जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. "मोदी हटाव, देश बचाव" अशा घोषणांसह विद्यार्थ्यांवरील कथित लाठीमाराचा निषेध नोंदविण्यात आला.




यावेळी वक्त्यांनी सांगितले की, पेपरफुटीच्या विरोधात देशभरातील युवक शांततापूर्ण आंदोलन करत आहेत. अशा आंदोलनावर लाठीचार्ज करणे हे लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचा आरोप त्यांनी केला. विविध पक्षांची आंदोलने दडपण्याचा प्रयत्न यापूर्वी झाला असला, तरी हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे नसून देशातील युवकांच्या न्याय्य मागण्यांसाठी असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

या आंदोलनात तातुजी देशमुख, सरोज देशमुख, रामभाऊ देवसरकर, ॲड. शिवाजी वानखेडे, संदीप ठाकरे, स्वप्निल कनवाळे, राजू जयस्वाल, रामभाऊ चौधरी, राजेश खामनेकर, अजय नरवाडे, राहुल सोनुने, संतोष जाधव, गजेंद्र ठाकरे, राहुल मोहितवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे भास्कर पंडागळे, दिनेश रावते यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले.

आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# महागाव नगरपंचायतीचे उपाध्यक्ष भरवाडे व माजी जि.प.सदस्य भडंगे यांचा शिवसेनेत प्रवेश

प्रतिनिधी २४ जुलै

**महागाव/उमरखेड :** उमरखेड विधानसभा मतदारसंघातील महागाव नगरपंचायतीचे उपाध्यक्ष प्रमोद ऊर्फ शाखा भरवाडे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग भडंगे यांनी मुंबई येथील बाळासाहेब भवनात शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत त्यांनी पक्षात प्रवेश केला.

हा पक्षप्रवेश उद्योगमंत्री उदय सामंत, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शिवसेना सचिव मोरे, उपनेते आनंदराव जाधव, पश्चिम विदर्भ सहसंपर्कप्रमुख पराम पिंगळे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, हरिहर लिमनवार, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, राजुदास जाधव, गजानन डोमाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा उपजिल्हाप्रमुख डॉ. बी. एन. चव्हाण, साहेबराव कांबळे यांच्यासह शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला.



यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख राजू राठोड, भोकर तालुकाप्रमुख नरेंद्र राठोड, विभागप्रमुख अमोल जाधव पाटील, युवा सेना शहरप्रमुख आकाश बेलखेडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या "८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण" या विचारधारेवर शिवसेनेची वाटचाल सुरू असून, प्रमोद भरवाडे आणि पांडुरंग भडंगे यांच्या प्रवेशामुळे महागाव तालुक्यात पक्ष संघटनेला नवे बळ मिळेल.

दोन्ही नेत्यांचे शिवसेना परिवारात स्वागत करण्यात आले. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे महागाव तालुक्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, शिवसेना अधिक मजबूत करण्यासाठी सर्व पदाधिकारी एकजुटीने कार्य करतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# पिंपळगाव लघु प्रकल्पात बुडून इसमाचा मृत्यू

### वडद गावावर शोककळा

प्रतिनिधी २४ जुलै

**महागाव :** महागाव तालुक्यातील वडद (मुडाणा) येथील रहिवासी प्रकाश किसन दिघाडे (वय ५८) यांचा पिंपळगाव लघु प्रकल्पाच्या तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून गावावर शोककळा पसरली आहे.

प्रकाश दिघाडे हे २१ जुलै रोजी सायंकाळी शेतालगतच्या पिंपळगाव तलावात मासेमारीसाठी जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले होते. मात्र, रात्री उशिरापर्यंत ते परत न आल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. दुसऱ्या दिवशी दिवसभर तलाव परिसरात शोध घेऊनही त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर २२ जुलै रोजी महागाव पोलिस ठाण्यात ते हरवल्याची तक्रार नोंदविण्यात आली.

त्यानंतर २३ जुलै रोजी सकाळी पुन्हा तलाव परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली. यावेळी तलावाच्या पाण्यावर त्यांचा मृतदेह तरंगताना आढळून आला.

माहिती मिळताच महागाव पोलिस, पोलीस पाटील आणि ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी सवना येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी महागाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. प्रकाश दिघाडे यांच्या निधनामुळे वडद (मुडाणा) गावात शोककळा पसरली असून त्यांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# नाम फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी २४ जुलै

**पुसद :** नाम फाउंडेशनचे संस्थापक अभिनेते व समाजसेवक मकरंद अनासपुरे यांच्या वाढदिवसानिमित्त नाम फाउंडेशन, पुसदच्या वतीने जीवन ज्योती एड्स प्रतिबंध व प्रबोधन संस्था, पुसद येथे अनाथ, एकलपालक व गरजू मुलांसोबत प्रेमळ वातावरणात वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी मुलांसोबत केक कापून आनंदाचे क्षण वाटून घेण्यात आले. त्यांच्याशी संवाद साधत प्रेम, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि उत्साह हेच या उपक्रमाचे खरे समाधान ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. समाजातील गरजू, वंचित आणि निराधार घटकांसाठी सातत्याने कार्य करणारे मकरंद अनासपुरे यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभावे तसेच त्यांच्या सामाजिक कार्याला अधिक बळ मिळावे, अशा शुभेच्छा जीवन ज्योती एड्स प्रतिबंध व प्रबोधन संस्था, पुसद परिवाराच्या वतीने देण्यात आल्या. यावेळी नाम फाउंडेशनचे स्वप्नील देशमुख, मोंटू देशमुख, पप्पू डोंगरे, सचिन सुरोशे, पंचायत राज महाविद्यालयाचे प्राचार्य अश्विन आडे तसेच जीवन ज्योती संस्थेचे राहुल गायकवाड आदी उपस्थित होते.




## नगर परिषद कार्यालय नेर-नबाबपुर, जि. यवतमाळ

(आरोग्य विभाग)

दूरध्वनी क्र.- (07238)-299331 ई-मेल- mcnernababpur@gmail.com

**जा.क्र./आ.वि./783/2026** **दिनांक :- 23/07/2026**

### सार्वजनिक सूचना

### घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 ची अंमलबजावणी बाबत

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक 27 जानेवारी 2026 च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 निर्गमित करण्यात आलेले असून सदर नियम दिनांक 1 एप्रिल 2026 पासून अंमलात आले आहेत.

सर्व नागरिक, व्यापारी, संस्था, गृहनिर्माण संस्था, आस्थापना, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निमाण करणारे घटक (Bulk Waste Generators) यांना सूचित करण्यात येते की सदर नियमांनुसार व मा. सर्वोच न्यायालयाच्या नागरी अपील क्र. 6174 /2023 मधील आदेशानुसार प्रत्येक नागरिक व संस्थेवर कचरा वर्गीकरण व वैज्ञानिक व्यवस्थापनाची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

नियमांनुसार प्रत्येक घर, दुकान, आस्थापना, कार्यालय, हॉटेल, बाजारपेठ, संस्था व इतर कचरा निर्मात्यांनी खालीलप्रमाणे कचऱ्याचे स्त्रोतावरच वर्गीकरण करणे बंधनकारक राहील -

1. ओला कचरा अन्न, भाजीपाला अवशेष, स्वयंपाकघरातील कचरा
2. सुका कचरा प्लास्टिक, कागद, धातू, काच इत्यादी
3. सॅनिटरी कचरा डायपर्स, सॅनिटरी नॅपकिन्स इत्यादी
4. विशेष / घातक कचरा बॅटरी, बल्ब, औषधे, ई-कचरा इत्यादी

**नागरिकांची जबाबदारी :**

- घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण करूनच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे / घंटागाडीत सुपूर्द करणे.
- सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये.
- प्लास्टिक, बांधकाम कचरा, ई-कचरा इत्यादी स्वतंत्रपणे देणे.
- ओला व सुका कचरा मिसळून न देणे.
- सॅनिटरी कचरा सुरक्षिततरीत्या गुंडाळून देणे.
- कचरा जाळणे, नाले / रस्त्यावर टाकणे किंवा उघड्यावर फेकणे टाळणे.

**लोकप्रतिनिधींची जबाबदारी :**

- आपल्या प्रभागात / वॉर्डात जनजागृती करणे.
- नागरिकांना कचरा वर्गीकरणासाठी प्रोत्साहन देणे.
- स्वच्छता, कचरा प्रक्रिया व पर्यावरण संरक्षणाबाबत सक्रिय सहभाग घेणे,
- स्थानिक स्वराज्य संस्थेस सहकार्य करून नियमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
- Bulk Waste Generators (मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे) यांची जबाबदारी :

ज्या संस्था / इमारती / संकुले यांचे क्षेत्रफळ 20,000 चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा दररोज 100 किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो अथवा 40,000लिटरपेक्षा जास्त पाण्याचा वापर होतो, अशा आस्थापनांना Bulk Waste Generators म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**अशा संस्थांनी-**

- ओल्या कचऱ्याची जागेवरच कंपोस्ट / बायोगॅस प्रक्रिया करणे,
- कचऱ्याची स्वतंत्र साठवणूक व वर्गीकरण करणे,
- प्रक्रिया न झालेला कचरा उघड्यावर टाकू नये,
- महानगरपालिका / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सूचनांचे पालन करणे,
- अधिकृत कचरा प्रक्रिया यंत्रणेशी समन्वय ठेवणे बंधनकारक राहील.
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापनांवर "Polluter Pays Principle" नुसार दंडात्मक कारवाई व पर्यावरण भरपाई आकारण्यात येईल.

तरी सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी घनकचरा व्यवस्थापन नियम, 2026 चे काटकोर पालन करावे, ही विनंती.

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद नेर नबाबपूर जि.यवतमाळ**

# महागावात काँग्रेस-मार्क्सवादी पक्षाचा रास्ता रोको

### तासभर वाहतूक ठप्प; जंतर-मंतरवरील कारवाईच्या निषेधार्थ आंदोलन

प्रतिनिधी २४ जुलै

**महागाव :** नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईचा निषेध, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांवर तोडगा काढण्याची मागणी तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावरील कारवाईच्या निषेधार्थ महागाव येथे शुक्रवारी काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभेच्या संयुक्त विद्यमाने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात सुमारे एक तास वाहतूक ठप्प झाली.



छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रास अभिवादन करून सकाळी ११ वाजता नवीन बसस्थानक परिसरातून आंदोलनाची सुरुवात झाली. त्यानंतर आंदोलकांनी बाबासाहेब आंबेडकर चौकात रस्त्यावर ठिय्या देत केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली. त्यामुळे दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागून काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. आंदोलकांनी जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्ज, अश्रुधूर आणि पाण्याच्या फवाऱ्याच्या वापराचा निषेध व्यक्त केला. तसेच विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक मागण्या तातडीने मान्य कराव्यात, नीट (NEET) परीक्षेतील कथित गैरप्रकारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांवरील कारवाई थांबवावी, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनादरम्यान काही काळ तणाव निर्माण झाल्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेऊन महागाव पोलीस ठाण्यात नेले. त्यानंतर काही काळ वातावरण अधिक तापले; मात्र पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली.

या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक, वनमाला राठोड, डी. बी. नाईक, देविदास मोहकर, शैलेश कोपरकर, नगराध्यक्ष सुनंदा कोपरकर, महेंद्र कावळे, दलितानंद खडसे, तालुकाध्यक्ष सुनील राठोड, इम्रान पठाण, बंटी पठाण, स्वप्निल नाईक, जयश्री नरवाडे, विलास पाईकराव, पुंडलिक भुरके यांच्यासह काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभेचे शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महागाव पोलिसांनी परिसरात अतिरिक्त बंदोबस्त तैनात करून कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आवश्यक खबरदारी घेतली.

# सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




## विशेष गौरव पुरस्कारासाठी माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांकडून अर्ज आमंत्रित

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील माजी सैनिक, वीर पत्नी आणि त्यांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने 'विशेष गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पात्र उमेदवारांनी 1 सप्टेंबर 2026 पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे. याविशेषगौरवपुरस्कारासाठीकाहीप्रमुखनिकषनिश्चितकरण्यातआलेआहेत.

# शहर कॉँग्रेसचे केंद्र सरकारविरोधात धिक्कार आंदोलन

## धर्मेंद्र प्रधान इस्तिफा दो - विद्यार्थीयोंको न्याय दो - जोर जुल्म की टक्कर में संघर्ष हमारा नारा है ! - शहराध्यक्ष बबलु शेखावत

प्रतिनिधी २४ जुलै




**अमरावती :** "धर्मेंद्र प्रधान इस्तीफा दो... विद्यार्थीयोंको न्याय दो... नरेंद्र मोदी हटाव देश बचाव .... अशा संतप्त आणि जोशपूर्ण घोषणांनी आज अमरावती शहरातील जयस्तंभ चौक व संपूर्ण मार्केट परिसर दणाणून गेला. अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने केंद्र सरकारच्या कथित विद्यार्थीविरोधी भूमिकेच्या निषेधार्थ आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी महात्मा गांधी पुतळा, जयस्तंभ चौक येथे धिक्कार आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते.या आंदोलनाचे नेतृत्व अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलु शेखावत यांनी केले. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, महानगरपालिका विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शहरातील काँग्रेसचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी, माजी व विद्यमान लोकप्रतिनिधी, नगरसेवक-नगरसेविका, युवक काँग्रेस, एनएसयूआय, महिला काँग्रेस, सेवादल, ओबीसी, एससी, एसटी, अल्पसंख्याक विभाग, सोशल मीडिया विभाग तसेच विविध सेल व विभागांचे पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.नेत्यांनी सांगितले की, जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जमध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून त्याचा निषेध देशभरातून होत आहे. या घटनेची जबाबदारी निश्चित करून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

तसेच या प्रकरणाच्या निषेधार्थ देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान निवासस्थानाबाहेर शांततापूर्ण आंदोलन केले असता त्यांच्यासह प्रियंका गांधी यांना अटक करण्यात आल्याचा उल्लेख करत, लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विरोधी पक्षाच्या नेत्यांवर झालेली ही कारवाई लोकशाही मूल्यांवर आघात करणारी असल्याचा आरोप काँग्रेसच्या नेत्यांनी केला.

यानंतर जयस्तंभ चौक ते संपूर्ण मार्केट परिसरात पायदळ मोर्चा काढण्यात आला. मोर्चादरम्यान परिसर घोषणांनी दणाणून गेला. "धर्मेंद्र प्रधान इस्तीफा दो", "विद्यार्थीयोंको न्याय दो", "मोदी तेरी तानाशाही नहीं चलेगी", "विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या धोरणांचा निषेध असो", "लोकशाही वाचवा – विद्यार्थ्यांना न्याय द्या" "नरेंद्र मोदी हटाव देश बचाव" अशा घोषणांद्वारे आंदोलनकर्त्यांनी आपला निषेध व्यक्त केला. यावेळी शहराध्यक्ष बबलु शेखावत यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर दडपशाही केली जात असेल, तर काँग्रेस पक्ष गप्प बसणार नाही. विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाहीला घातक असून देशातील प्रत्येक विद्यार्थी, पालक आणि नागरिकाने याविरोधात आवाज उठविण्याची गरज आहे. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी संबंधित प्रश्नांवर केंद्र सरकारने संवेदनशील भूमिका घेऊन निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली. आंदोलनाचा समारोप विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करत करण्यात आला. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या हिताच्या प्रश्नांवर काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू ठेवेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.याप्रसंगी स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल,महिला कॉंग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे,संजय वाघ,सलीम मिरावले,म,अश्फाक खान,दिनेश खोडके,श्रीधर पुरोहित,सोमेश्वर गौड,अनिल जोशी,अरुण बनारसे,नाना बारबुद्धे,विजय बर्वे,श्रीकांत नागरिकर,प्रदीप शेवतकर,शाफिउल्लाः खान,निसार खान जे.के.,प्रीतमसिंह ठाकूर, रोशन पिठेकर,संदीप मानकर,यांच्या सह असंख्य मान्यवर उपस्थित होते.

## साडे सहा लाखांच्या मुद्देमालासह आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २४ जुलै



**अमरावती :** पोलीस ठाणे ब्राम्हणवाडा थडी येथे एकुण ६,४८,४४०/- चा जुगार मुददेमालासह आरोपी ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपीमध्ये मो. रज्जाक मो. जहीर वय ३० वर्ष धंदा-मजुरी रा. बाजारपुरा ब्राम्हणवाडा थडी, योगेश सुधाकराव वानखडे वय ३४ वर्ष धंदा-मजुरी रा. पाचपावली ब्राम्हणवाडा थडी, नंदकिशोर शंकरराव जपुलकर वय ३१ वर्ष धंदा शेती रा. गांधी चौक ब्राम्हणवाडा थडी, शुभम संजय बावणे वय २४ वर्ष धंदा-शेती रा. गंगामाय मंदीर जवळ ब्राम्हणवाडा थडी,अलकेश बलदेव गित वय २५ वर्ष धंदा-मजुरी रा. गवळीपुरा चिंचोली, सैयद तोसिब सैयद बब्बु वय ३३ वर्ष धंदा-मजुरी रा. चिंचोली, आकाश किसनराव धुर्वे वय २४ वर्ष धंदा-मजुरी रा. गवळीपुरा चिंचोली, सुरज बाबाराव भिमटे वय ३० वर्ष धंदा-मजुरी रा. बाजारपुरा ब्राम्हणवाडा थडी

, यश संजयराव कोसे वय १९ वर्ष धंदा-मजुरी रा.रामापुर चौक ब्राम्हणवाडा थडी, सतिश संतोषराव दामडे वय ३५ वर्ष धंदा-शेती रा. कुंभारपुरा ब्राम्हणवाडा थडी, सुकराम भैयालाल बारस्कर वय ३० वर्ष धंदा मजुरी रा. गवळीपुरा चिंचोली पोलीस स्टेशन ब्राम्हणवाडा थडी येथे दि.२१/०७/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, ग्राम

गवळीपुरा चिंचोली येथे काही ईसम ५२ तास पत्यावर एक्का बादशाह नावाचा पैशाच्या हारजितीचा जुगार खेळ खेळत आहे अशी गोपनीय माहिती मिळाल्यावरून पोलीस स्टॉपसह गवळीपुरा चिंचोली येथे जुगार रेड कार्यवाही केली. यावेळी आरोपीच्या ताब्यातुन एकुण कि. ६,४८,४४०/- रूपये जुगार मुददेमाल मिळुन आल्याने नमुद आरोपीताविरूध्द पोस्टेला अपक ३१४/२०२६ कलम १२ (अ) मुबंई जुगार कायदया अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाही निकेतन कदम पोलीस अधिक्षक अमरावती (ग्रा) यांचे आदेशाने, दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधिक्षक, . माधवराव गरूड साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी धारणी, .पो.नि.. अशोक लांडे स्थानिक गुन्हे शाखा अमरावती यांचे मार्गदर्शनात सहा.पो.नि. प्रमोद राउत ठाणेदार पो. ठाणे ब्राम्हणवाडा थडी पोहवा. राजु मरस्कोल्हे, पोका अनुप मानकर, अंकुश दाभाडे, विशाल सिंघल, दिलीप उईके पो. ठाणे ब्राम्हणवाडा थडी यांनी केली.

## विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी दर्यापूर दणाणले; सर्वपक्षीय विद्यार्थी मोर्चातून शासनाला निर्वाणीचा इशारा

प्रतिनिधी २४ जुलै



**अमरावती :** जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे समाजसेवक सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदला दर्यापूर शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांच्या न्याय, पारदर्शक शिक्षण व्यवस्था आणि निष्पक्ष परीक्षा प्रणालीच्या मागणीसाठी विविध राजकीय, सामाजिक व विद्यार्थी संघटनांनी एकत्र येत सर्वपक्षीय विद्यार्थी समर्थन मोर्चा काढून शासनाचे लक्ष वेधले.

वंचित बहुजन आघाडी भारतीय कम्युनिस्ट पक्ष डावे पक्ष व विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली गांधी चौक ते उपविभागीय अधिकारी कार्यालय असा भव्य, शिस्तबद्ध व शांततापूर्ण मोर्चा काढण्यात आला. मोर्चात विद्यार्थी, विद्यार्थिनी, युवक, विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "विद्यार्थ्यांना न्याय मिळालाच पाहिजे","शिक्षणातील अन्याय बंद करा", "विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ थांबवा" अशा घोषणांनी शहर परिसर दणाणून गेला.

मोर्चानंतर राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्या नावे उपविभागीय अधिकारी, दर्यापूर यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या तातडीने मान्य कराव्यात, शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून पारदर्शक, उत्तरदायी आणि निष्पक्ष परीक्षा व्यवस्था उभी करावी, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा अन्याय थांबवावा तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.

या सर्वपक्षीय विद्यार्थी समर्थन मोर्चात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे इंजी. अनिकेत वाकपांजर, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे अंकुश वाकपांजर, भारतीय बौद्ध महासभेचे विजयकुमार चौरपगार, साहेबराव वाकपांजर, विद्यासागर कोल्हे, कॉ. नितीन गादे यांच्यासह विविध सामाजिक, राजकीय व विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## समाधान शिबिराचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन

### आ. रवी राणा, मा. खा. नवनीत राणा यांच्या उपस्थितीत पालकमंत्री यांनी सिंधी समाजाला लिज पट्टे वाटप केले

प्रतिनिधी २४ जुलै



**अमरावती :** आमदार रवी राणा यांच्या पुढाकारातून आयोजित छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे उद्घाटन राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिबिराला रेकॉर्डब्रेक प्रतिसाद मिळाला असून ६८०० लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ वितरित करण्यात आला.

आमदार रवी राणा, माजी खासदार नवनीत राणा यांच्या उपस्थितीत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते लीज पट्ट्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. हाऊसफुल सभागृहातील उपस्थित लाभार्थ्यांनी आपल्या मोबाईलची फ्लॅशलाइट सुरू करून मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच स्व. अजित दादा यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी लाभार्थ्यांनी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्याचेही कौतुक केले.आपल्या मनोगतात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्या लोकाभिमुख कार्याचे कौतुक केले. तसेच भाजपच्या स्टार प्रचारक सौ. नवनीत राणा या मोठ्या मताधिक्याने विजयी होऊन पुन्हा संसदेत जातील, असा विश्वास व्यक्त केला.

पालकमंत्री यांनी आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्या वृक्षारोपण मोहिमेचे आणि जनसेवेतील योगदानाचे विशेष कौतुक केले. इरविन चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळास्थळ उभारणीसाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यात येणार असून अमरावती जिल्ह्यात एक लाख घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

शिबिरामध्ये विविध शासकीय योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात वितरित करण्यात आला. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण व शहरी), रमाई आवास योजना, लेक लाडकी योजना, तेजस्विनी प्रकल्प, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना, पंडित दीनदयाल उपाध्याय योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, महिला बचत गट कर्ज वाटप, अतिक्रमण पट्टे, शिंदी पट्टा वाटप, कृषी यांत्रिकीकरण योजना, अन्नप्रक्रिया योजना, फळबाग लागवड, नवीन विहिरी, स्प्रे पंप, झटका मशीन, समुदाय गुंतवणूक निधी, वैयक्तिक कर्ज, अपंग कल्याण निधी, श्रावणबाळ योजना, संजय गांधी योजना, गोल्डन कार्ड, बाबा कार्ड, जन्मदाखले, जात प्रमाणपत्रे, अपंग प्रमाणपत्रे, एसटी सवलत कार्ड, कौशल्य प्रशिक्षण आदी योजनांचा समावेश होता.

## जिल्हाधिकारी कार्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना अभिवादन

प्रतिनिधी २४ जुलै

**अमरावती :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज अधिक्षक निलेश खटके यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. यावेळी अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करून आदरांजली वाहिली.

## विधी स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी २४ जुलै

**अमरावती:** जिल्हा व सत्र न्यायालय येथे बुधवार, दि. 22 जुलै रोजी विधी स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. सदर कार्यशाळेला 73 नवनियुक्त विधी स्वयंसेवक प्रशिक्षणासाठी प्रत्यक्षरित्या, तसेच तालुकास्तरावर नवनियुक्त 207 विधीस्वयंसेवक आभासी पद्धतीने उपस्थित होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या उज्वला नंदेश्वर, जिल्हा व सत्र न्यायालय जिल्हा न्यायाधीश ए. जी. जोशी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, तसेच जिल्हा सहकारी वकील परिक्षीत गणोरकर यांचे हस्ते उद्घाटन झाले. यावेळी उज्वला नंदेश्वर यांनी विधी स्वयंसेवक यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देऊन स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये विधी स्वयंसेवक यांना विविध विषयावर प्रमुख वक्ते यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेमध्ये विधी स्वयंसेवक यांना ॲड. सपना काळे, श्री. विधळे, पॅनल अधिवक्ता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती सखी वन स्टॉप सेंटरच्या समुपदेशिका वर्षा देशमुख, सायबर सेलचे निखील माहुरे, उपमुख्य अधिवक्ता ॲड. अमित सहारकर, पंजाबराव विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

## एका इसमास पोलीस घेतले घातक शस्त्रासह ताब्यात

प्रतिनिधी २४ जुलै




**अमरावती :** पोलीस आयुक्त यांनी अमरावती शहरा मध्ये अवैध्यरित्या घातक शस्त्र बाळगुण दहशत निर्माण करणा-या इसमांवर धाडी टाकुण योग्य प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे आदेश प्राप्त झाले वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

आर्म अॅक्ट कार्यवाही नुसार कारवाई करण्यात आले.

दिनांक २३ जुलै रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय बातमीदारा मार्फत माहीती मिळाली कि, एक इसम नामे अब्दुल रहेमान रा. इमाम नगर, अमरावती हा एका प्लास्टिक पोत्या मध्ये तलवार, गंगवा (कोयता) व कटयार असे घातक शस्त्र घेवुन लालखडी चौक कडुन नवसारी चौक कडे पायदळ येत आहे. वरून सदर ठिकाणी गुन्हे शाखेचे पथकाने सापळा रचुन नमुद इसम हा पायदळ येताना दिसुन आला त्यास गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने ताब्यात घेवुन त्याचे हाता मधिल प्लास्टीक पोत्याची पाहणी केली असता त्यामध्ये एक स्टिलची धारदार तलवार, गंगवा (कोयता) व कटयार असा एकुण कि.अ. ६,०००/- रू चा मुददेमाल दिसुन आल्याणे नमुद शस्त्र जप्त करून आरोपी विरुध्द पो.स्टे. नागपुरी गेट येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोको प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

## पालकमंत्री यांची एकाच दिवशी तीन महाराजस्व शिबिरांना उपस्थिती

### नागरिकांपर्यंत पोहोचून सेवा देण्यासाठी उपक्रम- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

प्रतिनिधी २४ जुलै



**अमरावती** शासकीय सेवा नागरिकांपर्यंत पोहोचून देण्यासाठी राज्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना विविध सोयी या उपक्रमात उपलब्ध करून देण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त नागरिकांपर्यंत सेवा पोहोचवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीसांगितले.


जिल्ह्यात आज एकाच दिवशी तिवसा, अमरावती आणि चिखलदरा या तीन ठिकाणी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराजस्व शिबिराला भेट दिली. तिवसा येथील कार्यक्रमात पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवून लोकाभिमुख आणि पारदर्शी प्रशासन राबविण्यासाठी महाराजस्व शिबिर घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती आणि विज बिल माफ करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार या आश्वासनांच्या पूर्तता करणे सुरू झाले आहे. 35 लाख शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होणार असून पहिल्या टप्प्याला सुरुवात झाली आहे. तसेच गेल्या पंधरा वर्षातील विज बिल माफ करण्यात आले असून याचा लाभ 45 लाख शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांना फायद्याचे ठरणारे पांदण रस्ते राबविण्यावर भर देण्यातयेणारआहे.

जिल्ह्यात राबविण्यात आलेला महसुली तंटामुक्त गाव अभियान राज्यस्तरावर राबविण्यात येणार आहे. यामुळे गावातील तंटे कमी होण्यास मदत होईल. त्यासोबतच शेतीमध्ये काम करणाऱ्या मजुरांनाही शेतकऱ्यांचा दर्जा देण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना मिळणारे सर्व लाभ त्यांना मिळू शकतील. जिल्ह्यातील बोगस बियाण्याबाबत कठोर कारवाई करण्यात आली असून कंपनीविरुद्ध 35 गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई आणि दुबारपेरणीसाठी मदत दिली जाणारआहे,असेसांगितले.

तिवसा येथील कार्यक्रमाला आमदार प्रविण पोटे, राजेश वानखेडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. अमरावती येथील कार्यक्रमात इर्विन चौकातील जमीन संपादन करण्यास यश मिळाले असून या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्वांग सुंदरस्मृतीस्थळउभारण्यातयेणार आहे. यासाठी 15 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याठिकाणी असलेली जागा लवकर तब्येत घेऊन विदर्भातील सुंदर स्थळ उभारण्यात येईल.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



हाच तो नमुना 'ड'


वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची लुबाडणूक...

शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून अतिक्रमण

शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण !

* वस्तीगृहाच्या नावावर अनुदान लूटले, आता पुन्हा बांधकाम करीत सुटले

अतिक्रमण

गरीबांचे काढतात, श्रीमंतांचे सोडतात !

गरीब, श्रीमंत असा भेदभाव करतात

शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण...

वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची फसवणूक

* चौकशी करून गुन्हे दाखल करा ; अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हडे पाटील यांचा इशारा

नियमाला हरताळ, कारवाईस टाळाटाळ!

'त्या' वादग्रस्त जागेचा नमूना 'ड' रद्द!

'राजाश्रय' असलेल्या संस्थाचालकांना भूमि अभिलेख कार्यालयाचा दणका

सिध्द झाली गुन्हेगारी, दाखल करा फौजदारी !

# अतिक्रमीत जागेत पैसे लाटण्याचा उपक्रम, 'त्या' संस्थेत घोटाळयाचा पराक्रम !

*** 'ती' वादग्रस्त जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने**

*** माजी कर्तेधर्ते सोमाणी आणि विद्यमान अध्यक्ष मालाणी यांच्या कार्यकाळातील कारभाराची सखोल चौकशी करा**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●





येथील राजस्थान शिक्षण संस्थेने अतिक्रमण केलेल्या शासकीय जागेवर मुलींच्या वसतीगृहाची ईमारत बेकायदेशीर बांधल्या प्रकरणी 'या' संस्थेतील गैरकारभार चव्हाट्यावर आला आहे.शासनाने त्या वादग्रस्त जागेचा नमूना 'ड' चार वर्षापुर्वीच रद्द केला आहे.तरीपण राजस्थान शिक्षण संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ठाकूरदास मालाणी व त्यांच्या कार्यकारिणीतील उच्चशिक्षीत आणि फक्त सह्याजीराव असलेल्या संचालक मंडळाने 'ती' वादग्रस्त मुलींच्या वसतीगृहाची जागा वाशीम येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने दिल्याचा पराक्रम केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.आधीच या संस्थेचे माजी सचिव,कार्याध्यक्ष आणि सह्याचे अधिकार असलेले राजेंद्र सोमाणी यांच्या कार्यकाळातील अनेक घोटाळे झाल्यामुळेच त्यांची विद्यमान संचालक मंडळातून हकालपट्टी करण्यात आली आहे.सोमाणींचा कित्ता मालाणींनी घडविल्यामुळे 'या' संस्थेच्या मागील २० वर्षातील आर्थिक व्यवहारासह संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व ठरावाची शासनाने सखोल चौकशी करण्याची मागणी केल्या जात आहे.

येथील राजस्थान शिक्षण मंडळाद्वारे संचालीत राजस्थान आर्य कला,मि.क. वाणिज्य आणि स.रा.राठी विज्ञान महाविद्यालय,वाशीम तसेच रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी जवाहर नवोदय विद्यालयाजवळ असलेल्या शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्या जागेवर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या कोट्यवधीच्या निधीतून मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली.हे बांधकाम तत्कालीन कर्तेधर्ते आणि कमिशन खाण्यात पटाईत असलेल्या कारभारी राजेंद्र सोमाणी यांच्या अधिपत्याखाली झाल्याचे सर्वश्रृत आहे.

उल्लेखनिय म्हणजे या वसतीगृहाचे बांधकाम झाले तेव्हापासून या वसतीगृहात राजस्थान महाविद्यालयातील एकही मुलगी त्या वसतीगृहात राहिली नसल्याची बाबही जगजाहिर आहे.पैशासाठी काहीही करणाऱ्या लालची सोमाणींनी या मुलींच्या वसतीगृहात शासकीय ,खासगी सेवेत असलेल्या अधिकारी,कर्मचाऱ्यांना भाडेतत्वावर खोल्या दिल्याचीही बाब यापुर्वीच सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी उघडकीस आणली होती.देवढे यांनी शासनासह वाशीमच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे 'या' वादग्रस्त अतिक्रमीत जागेसंदर्भात पुराव्यासह तक्रारी देवून सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करून ती वादग्रस्त जागा शासनाने ताब्यात घेण्यासाठी पाठपुरावा केला आहे.अद्यापही देवढे यांचा पाठपुरावा सुरूच असून जिल्हाप्रशासनाने मौनव्रत धारण करून राजस्थान शिक्षण मंडळातील आजी-माजी संचालकांना 'आश्रय' दिल्याची चर्चा आहे.म्हणूनच या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ठाकूरदास मालाणी यांनी व त्यांच्या सहकारी संचालकांनी शासकीय जागेवर अतिक्रमण करुन संस्थेने बेकायदेशीर बांधकाम केलेल्या मुलींच्या वसतीगृहाची ईमारत वाशीमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने दिल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

शासनाने राजस्थान शिक्षण मंडळ,वाशीम च्या मागील २० वर्षातील सर्व आर्थिक व्यवहाराची आणि आजी-माजी संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व ठरावाची वरिष्ठ सनदी अधिकाऱ्या मार्फत चौकशी करून या घोटाळ्यात व भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या सर्व दोषींविरूद्ध फौजदारी कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे यांनी केली आहे.

### 'डीन' ची भूमिका संशयास्पद
### मुलींच्या वसतीगृहाच्या भाडेपट्ट्यात 'डीन' लाभार्थी

शासनाला कोणतीही खासगी जागा भाडेतत्वावर घ्यायची असेल तर त्या जागेच्या मालकीहक्कासह,बांधकामाची परवानगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र,जागेचा नमूना 'ड' अशा विविध आवश्यक कागदपत्राची शहानिशा केल्यानंतरच त्या जागेचा भाडेकरार केल्या जातो.मात्र,वाशीम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या 'डीन' यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी राजस्थान महाविद्यालयाने शासकीय जागेवर बेकायदेशीर बांधकाम केलेल्या मुलींच्या वसतीगृहाची ईमारत भाडेतत्वावर घेतांना स्वत:चा आर्थिक लाभ होण्यासाठी 'त्या ' वादग्रस्त जागेचा भाडेकरार करून लाभार्थी होण्याचा बहुमान पटकावल्याची शिक्षण वर्तुळात चर्चा आहे.

## थोडक्यात

### वडजी येथे आत्माअंतर्गत नैसर्गिक शेतीशाळा



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील वडजी येथे दि. २३ जुलै २०२६ रोजी आत्मा (ATMA) अंतर्गत नैसर्गिक शेती शाळेचे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

अरिफ शाह जिल्हा कृषी अधिक्षक वाशीम ,प्रकल्प संचालक अनिसा महाबळे, तालुका कृषी अधिकारी मगनदास तावरे, यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.या नैसर्गिक शेती शाळेमध्ये सोयाबीन पिकामध्ये कीड व्यवस्थापनासाठी पक्षी थांबे (ऀ झीम्पे) व चिकट सापळे (एूम्ब्ळ ॐजे) उभारणीबाबत प्रात्यक्षिक देण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना दशपर्णी अर्क व निंबोळी अर्क तयार करण्याची पद्धत समजावून सांगण्यात आली. नैसर्गिक पद्धतीने पीक संरक्षण कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. फार्मर ग्रुप लिग (इउथ) मध्ये सहभाग नोंदणीबाबतही शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. यावेळी आत्मा अंतर्गत सचिन इंगोले यांनी उपस्थित शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात मार्गदर्शन केले. बबन बोर्ड कृषी अधिकारी कार्यक्रमास प्रदीप बोरकर, जना जवाळे, भागवत बोरकर, आकातराव बोरकर, कृषी सखी अनिता शिरे, सुनिता जवाळे तसेच परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये नैसर्गिक शेतीबाबत जागरूकता निर्माण होऊन खर्चात बचत व उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### घोटा येथे आयोजित शेती शाळेला उस्फूर्त प्रतिसाद



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

संगमेश्वर शेतकरी गटाने कार्यशाळेत शेतकऱ्यांना चिकट सापळे व कामगंध सापळे याचे काय महत्त्व असते ते पटवून सांगण्यात आले व त्यांना चिकट सापळे व कामगंध सापळे गटाने आणून शेतकऱ्यांना वाटप करून शेतकऱ्यांना सांगण्यात आले की कामगंध सापळे हे आपल्या शेतात लावावे.संगमेश्वर शेतकरी गटाने पुढाकार घेऊन शेती शाळा आयोजित केली. या शेती शाळेमध्ये गावातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवून सहभाग घेतला.

या शेती शाळेचे आयोजन सहायक कृषी अधिकारी संतोष आरू,ए.पी.देशमुख, निमंत्रक किशोर मोरे, पत्रकार दिपक मापारी,यांच्या मार्गदर्शनाखाली या शेती शाळेचा आयोजन करण्यात आले होते. निमंत्रक किशोर मोरे यांनी पिकाचे व्यवस्थापन आणि सरकारी योजना अधिकारी यांच्यासोबत समन्वय साधून आपल्याला योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घेण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाला सहाय्यक कृषी अधिकारी संतोष आरू, पाणी फाउंडेशनचे मेंटार ए.पी. देशमुख, संगमेश्वर शेतकरी गटाचे निमंत्रक किशोर मोरे, सर्व सदस्य निलेश गोडघासे, बळीराम मोरे, किसन शेंडगे, संदीप अवचार, विजय मोरे, गणेश देशमुख, ज्ञानेश्वर मोरे, दिपक मापारी पत्रकार, संतोष सरनाईक, तसेच शेतकरी संतोष मोरे, संतोषदादा मोरे, संजय लोखंडे, संजय मोरे, संजय मोरे, भागवत लोखंडे, प्रभाकर मोरे, भुजंगराव मोरे, प्रकाश मोरे, कार्तिक मोरे, संतोष लोखंडे, परसराम मोरे, हरिभाऊ मोरे, गणेश देशमुख, शेतकरी बांधव यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.

# नियमांची होतंय पायमल्ली, प्रशासनाची उडवली खिल्ली !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●






जिल्ह्यातील शेलुबजार येथे उत्पादीत होणारा कथित लेमन सोडा संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. सदर लेमन सोड्याच्या बाटलीवर उत्पादन तारीखच नसल्याचा पाठपुरावा करूनही अन्न व औषध प्रशासन विभाग झोपेचे सोंग घेत मूग गिळून गप्प का ? असा सवाल उपस्थित होत आहे. परिणामी नियमांची होतंय पायमल्ली अन् प्रशासनाची खिल्ली उडत असल्याचे अपरोधाने सर्व सामान्य नागरिक बोलत आहेत.

नजीकच्या शेलुबाजार येथील उत्पादन तारीख नसलेल्या कथित लेमन सोड्याच्या बातमीने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असली तरी, विक्रीची स्थिती मात्र अजूनही जैसे थे आहे. विशेष धक्कादायक बाब म्हणजे या बाटल्यांची विक्री केवळ पानटपऱ्या, किराणा दुकानावरच नव्हे; तर सरकार मान्य देशी दारूच्या गुत्त्यांवरही सर्रास सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शेलुबाजार येथे एर्ऊऍएन्र्ळ सॉफ्ट ड्रिंक्स अँड मिनरल वॉटर प्रा. लि. कंपनीच्या उत्पादन तारीख नसलेल्या लेमन सोडा बाटल्या अजूनही सर्रास विकल्या जात आहेत. ही बाब म्हणजे अन्न सुरक्षा नियमांना धाब्यावर बसवून प्रशासनाच्या कारवाईला उघड आव्हान दिल्यासारखे आहे. लेमन सोडा हे एक पाचक पेय असल्याने सर्वच वयोगटातील लोकं मोठ्या आवडीने पितात. त्यामुळे या पेयाच्या विक्रीसाठी परमिशन लागत नाही. परंतु त्या पेयाचा विक्रिकाळ अनिश्चित असल्याने ते दुकानात साठवून ठेवावे लागते. परिणामी सदर लेमन सोडा किती दिवसासाठी पिण्यायोग्य आहे याची माहिती प्रत्येक बाटलीवर असणे आवश्यक असून अन्न सुरक्षा नियमांनुसार ते बंधनकारक सुद्धा आहे. मात्र उत्पादक कंपनीने बाटलीवर FSSAI लायसन्स नंबर ११५२४०६६०००११५ टाकून उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि अंतिम तारीख याची कुठलीही माहिती स्पष्ट न करता केवळ ' SEE BOTTLER NECK/ CAP

### शेलुबाजार येथील कथित लेमन सोडा प्रकरणाची चौकशी कधी ?

प्रशासनाची दिशाभूल केल्याचे उघड होत आहे. या गंभीर प्रकरणाचा सिटीन्यूज सुपरफास्टने सातत्याने पाठपुरावा करूनही अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम यांनी कोणतीही तपासणी किंवा जप्तीची कारवाई केली नाही. त्यामुळे ' कायदा फक्त कागदावरच आहे का ? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

**प्रशासनाने नव्हे; तर नागरिकांनी केली पडताळणी...**

स्वतःच्या आर्थिक लाभासाठी कथित उत्पादक केवळ प्रशासनाची दिशाभूल नाही तर ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ खेळत असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. एक सामाजिक बांधिलकी म्हणून गेल्या दोन दिवसापासून सिटीन्यूज सुपरफास्टने बातम्या प्रकाशित करुन ही गंभीर बाब सबंधित प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. मात्र अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम या प्रकरणाकडे अक्षम्य दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला जात आहे. या गंभीर बाबीची पडताळणी करण्यासाठी काही व्यक्तींनी देशी दारूच्या गुत्त्यावर जाऊन १० रुपयाची लेमन सोडा बाटली विकत घेऊन पुराव्यासाठी ऑन लाईन पेमेंट केले आहे. सदर बाटलीवर सुद्धा उत्पादन तारीख नसल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे या सबंधित प्रशासनाने तातडीने छापा टाकून साठा जप्त करावा आणि संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.


मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

लेमन सोडा बाटलीवर नाही एक्सपायरी डेट, कारवाई करा थेट !

*शेलुबाजार येथील अक्षम्य प्रकार *अन्न व औषध प्रशासन काय कारवाई करणार ?

बुधवार, दि. २२ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

पॅकिंगवर नाही उत्पादन तिथी, ग्राहकांच्या आरोग्याची माती !

गुरूवार, दि. २३ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

नियम - कायदा धाब्यावर, लेमन सोडा देशी दारूच्या गुत्त्यावर !

शेलुबाजार येथील 'त्या' लेमन सोड्याची विक्री सुरूच...

## जऊळका रेल्वे येथे रानडुकरांचा हैदोस !

### चार वर्षीय चिमुकली गंभीर जखमी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



मालेगाव तालुक्यातील जऊळका रेल्वे येथे राहणाऱ्या एका चार वर्षे चिमुकलीवर रानडुकरांनी हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात चिमुकली गंभीर जखमी झाली असून तिला वाशीम येथील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.या घटनमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील जऊळका रेल्वे गावात रानडुकरांच्या हल्ल्यात चार वर्षीय चिमुकली गंभीर जखमी झाल्याची घटना आज सकाळी घडली. पूर्वा राम सावळे असे जखमी मुलीचे नाव आहे. आज सकाळच्या सुमारास रानडुकरांचा मोठा कळप जऊळका रेल्वे गावात शिरला. गावात धुमाकूळ घालत असताना रानडुकरांनी घराजवळ खेळत असलेल्या पूर्वा सावळे या चार वर्षीय चिमुकलीवर अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाली.घटनेनंतर ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेत मुलीची सुटका केली आणि तिला उपचारासाठी वाशिम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या तिच्यावर उपचार सुरू आहे.

दरम्यान, गावात वारंवार वन्य प्राण्यांचा वावर वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने तातडीने उपाययोजना करून रानडुकरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## रिसोड शहरात चिडीमारीला उधान !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

**रिसोड शहरातील शाळा व कॉलेज सुरू होऊन जवळपास एक महिन्याचा कालावधी होत आहे शाळा व कॉलेज समोर तसेच लोणी फाटा, बस स्थानक परिसरा मध्ये चिडीमारीला उधाण आले आहे शहरातील अतिक्रमण हि चिडीमारीला पुरक ठरत आहे.**



शाळा कॉलेज सुरू होऊन जवळपास एक महिन्याचा कालावधी लोटला आहे शहरा पेक्षा हि ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे रिसोड येथील श्री शिवाजी हायस्कूल, भारत माध्यमिक शाळा, व कन्या शाळा, उत्तमचंद बगडिया महाविद्यालय, पुष्पा देवी पाटील कॉलेज, आए टी आय कॉलेज, या ठिकाणी विद्यार्थी पेक्षाही विद्यार्थिनीची संख्या जास्त आहे या विद्यार्थिनी बस स्थानक परिसरामध्ये टवाळखोरांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे शहरासह तालुक्यात मागील काही महिन्यापासून अवैध धंद्यांना तसेच अवैध प्रवासी वाहतुकीला मोठे उधान आले आहे एखादे दिवशी बस लवकर निघून गेल्यास किंवा इतर कारणामुळे बस नसल्यास मुलींना खाजगी वाहनाने प्रवास करावा लागते खाजगी वाहना मध्ये पूर्ण भाडे घेऊनही मुलींना बसण्यासाठी जागा दिल्या जात नाही बस स्थानकावर होत असलेल्या त्रासामुळे काही पालक तर सर्व कामे सोडून आपल्या मुलींना दुचाकी वर ने आण करत असल्याचे दिसून येत आहे तसेच शाळा व कॉलेज भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेला दुचाकी वर ट्रिपल सीट सुसाट वेगाने दुचाकी फिरविणे टाटिंग करणे हे तर नित्याचेच झाले आहे लोणी फाटा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या रस्त्यावर संपूर्ण अतिक्रमण झाले आहे सकाळ संध्याकाळ या रस्त्यावर मोठी गर्दी होते भारतमाध्यमिक कन्या शाळेच्या मुलींना अतिक्रमाना सह टवाळखोरांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे लोणी फाटा येथे मुलींना बस ची वाट पाहत थांबावे लागते या ठिकाणी वाहतूक शाखा पोलीस तैनात असले तरी ते जास्त वेळ साखरा फाटा व मेहकर रोडवरच अर्थ कारण करीत असताना दिसून येतात नावाला निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे सकाळ संध्याकाळ निर्भया पथकाची दुचाकी वरून गस्त सुरू असते निर्भया पथक शहरात फिरताना कुठे आढळून येत नाही पोलीस प्रशासनाने चिडीमारांचा ट्रिपल सीट सुसाट वाहनांचा बंदोबस्त करून निर्भया पथक कार्यान्वित करावे अशी मागणी पालक वर्गाकडून केल्या जात आहे.

## दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर लाठीचार्जच्या निषेधार्थ... वंचीत बहुजन आघाडीचा मोर्चा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



दिल्ली मध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी चार्ज निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी कडून आज भारत बंदची हाक देण्यात आली .या बंदचे पडसाद वाशिम मध्ये दिसून आले .दरम्यान वंचितने शहरात मोर्चा काढून व्यापाऱ्यांना आपली प्रतिष्ठान बंद करण्याचे आव्हान केले.

दिल्लीत जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी चार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी करून आज भारत बंदची हाक देण्यात आली होती. याचे पडसाद वाशिममध्ये देखील उमटले असून वंचित च्या कार्यकर्त्यांकडून शहरात मोर्चा काढत व्यापाऱ्यांना दुकान बंद करण्याचा आवाहन केलं, या बंदला वाशिम मध्ये समिश्र प्रतिसाद मिळाला असून, कार्यकर्त्यांकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत लाठी चार्ज करणाऱ्या पोलिसांवर कठोर कारवाई करावी आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा घ्यावा अशी मागणी करण्यात आली. यावेळी बंद कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## श्री.संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●



श्री.संत गजानन महाराज संस्थान व सेवा समिती, ममता नगर बायपास, कारंजा यांच्या वतीने देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त शनिवार, २५ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता भव्य श्री.गजानन महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या पालखी सोहळ्यात कारंजा शहरासह ग्रामीण भागातील तसेच विविध भागांतून येणाऱ्या दिंड्यांचा उत्स्फूर्त सहभाग असणार आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात पार पडणार असून मोठ्या संख्येने भाविक सहभागी होणार आहेत. या भव्य व भक्तिमय पालखी सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री.संत गजानन महाराज संस्थान व सेवा समिती, ममता नगर, कारंजा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## लोकमान्य टिळक यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**बुलढाणा :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती आज २३ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, समाधान गायकवाड, तहसीलदार वृषाली केसकर, नायब तहसीलदार विजय हिवाळे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर तसेच उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# सर्वदूर चांगला पाऊस पडू दे, बळीराजा सुखी-समृध्द होऊ दे!

प्रतिनिधी २४ जुलै





**खामगाव:** आषाढी एकादशीनिमित्त रेल्वे विभागाकडून खामगाव रेल्वे स्थानकावरुन पंढरपूरकरिता जाणाऱ्या भाविकांसाठी विठ्ठल दर्शन एक्सप्रेसची व्यवस्था करण्यात आली आहे. विठ्ठल दर्शन एक्सप्रेसची दुसरी फेरी ७७२ वारकऱ्यांना घेऊन पंढरपूरकडे रवाना झाली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी उपस्थित राहून आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. तसेच विठूरायाने सर्वदुर चांगला पाऊस पाडावा व जगाचा पोशिंदा बळीराजाच्या शेतात भरघोस पिक यावे आणि प्रत्येक शेतकरी सुखी,समृध्दी व्हावा, अशी प्रार्थना विठुराया चरणी केली.

२३ जुलै सकाळी ११.३० वाजता खामगाव रेल्वे स्थानकावरुन विठ्ठल दर्शन एक्सप्रेसची दुसरी फेरी पंढरपूरकडे रवाना झाली त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर अध्यक्षा सरस्वती खासने, खामगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मनोज वानखडे, बाजार समितीचे संचालक विलाससिंग इंगळे, शहर उपाध्यक्ष नरहरी टिकार गुरुजी, माजी सरपंच पवन पवार, जयराम मुंडाले, वैशाली धनोकार, संजू शर्मा, हभप संगिता कानकिरड, हभप सुदाम महाराज राहणे, हभप बाळु इंगळे महाराज, हभप गजानन महाराज मेतकर ,दशरथ चऱ्हाटे आदींची उपस्थिती होती.

सर्वप्रथम राणा दिलीपकुमार सानंदा व सरस्वती खासने यांच्या हस्ते विठ्ठल रुख्माई व लोकनेते स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी भुसावळ रेल्वे विभागाचे असी. कमिश्नर अभय शर्मा, रेल्वे अधिकारी धर्माधिकारी, राऊत, स्टेशन प्रबंधक संजय भगत, लोको पायलट अशोक खऱ्हाटे आणि गार्ड सुमित कुमार यांचा शेला,टोपी देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी विठ्ठल दर्शन एक्सप्रेसला हिरवी झेंडी दाखविल्यानंतर रेल्वेगाडी पंढरपुरकडे रवाना झाली. गाडीमध्ये बसलेल्या भाविक भक्तांनी पंढरीनाथ महाराज की जय, गजानन महाराज की जयचा जयघोष केला.

सकाळपासूनच खामगाव रेल्वे स्थानकावर पंढरपूरकरीता जाण्यासाठी प्रवासी व नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती. पंढरपूरसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांना दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी हरिओम गृ्रप व सानंदा मित्र मंडळाच्या वतीने फराळाच्या पाकीट व केळीचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते पंढरपुरकडे जाणाऱ्या शेकडो वारकऱ्यांना आकर्षक छत्र्यांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी हभप संगिता कानकिरड यांच्या मार्गदर्शनाखाली मातोश्री सुलोचनादेवी हरिपाठ भजनी मंडळाच्या महिलांनी टाळ-मृंदुगाच्या गजरात भजन सादर करुन उपस्थितांचे लक्ष वेधुन घेतले. याप्रसंगी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी भक्तीरसात मग्न झाले होते.गुरुद्वारा सिंघ सभा कमिटीच्या वतीने भाविकांना चहा व पाण्याचे वितरण करण्यात आले. यावेळी अल्पसंख्यांक सेलचे तालुका अध्यक्ष बिलाल खान पठान, केशव कापले, प्रफुल कुळकर्णी,सत्यनारायण शर्मा, प्रताप कदम,मुन्ना बोंद्रे, पुरुषोत्तम शेजोळे,श्रीकृष्ण डाबेराव,सुरेंद्र चव्हाण, दुर्गासिंग ठाकुर,संतोष आटोळे,सुनिल देशमुख, निलेश शर्मा, बाबुराव वनारे, शेषराव गोरे, प्रतीक पारस्कर,अविनाश ढगे,शुभम मोरे, कल्याणसिंग वतपाळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

### भक्तांच्या सेवेसाठी २००३ पासून 'विठ्ठलदर्शन एक्सप्रेस'!

भक्तांच्या सेवेसाठी सन २००३ पासुन खामगाव रेल्वे स्थानकावरुन पंढरपूरला जाण्यासाठी विठ्ठल दर्शन एक्सप्रेसची सेवा सुरु करण्यात आली आहे. तेव्हापासुन हरिओम गृ्रप व सानंदा मित्र मंडळाच्या वतीने भाविक भक्तांना चहा,पाणी व फराळाचे वितरण करण्याची परंपरा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा व माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा यांच्या मार्गदर्शनाखाली मागील २३ वर्षापासून अविरतपणे सुरु आहे. या माध्यमातून रेल्वेला २ लाख ४८ हजार १७५ रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

## मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणे पडले महाग; युवकाविरुद्ध कारवाई

प्रतिनिधी २४ जुलै

**मलकापुर :** दारूच्या नशेत भरधाव व अनियंत्रितपणे बुलेट मोटारसायकल चालवून वाहतुकीला धोका निर्माण करणाऱ्या एका युवकाविरुद्ध मलकापुर शहर पोलिसांनी मोटार वाहन कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रुषिकेश संतोष वाघ (वय 23, रा. संताजी नगर, मलकापुर) हा दि. 22 जुलै रोजी दुपारी 2 वाजताच्या सुमारास एमएच-28-एपी-8999 क्रमांकाची बुलेट मोटारसायकल बुलडाणा रोडवरून बसस्थानकाच्या दिशेने भरधाव व वाकडी-तिकडी चालवत असल्याचे वाहतूक नियमनाच्या ड्युटीवर असलेल्या पोलिसांना आढळून आले. त्याला पंचांसमक्ष थांबवून चौकशी केली असता त्याची भाषा अडखळत असल्याचे तसेच तोंडातून मद्याचा वास येत असल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर आरोपीची उपजिल्हा रुग्णालय, मलकापुर येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तो मद्यप्राशन करून वाहन चालवत असल्याचा लेखी अहवाल दिल्यानंतर पोलिस कॉन्स्टेबल मोहन समाधान करांगळे यांच्या फिर्यादीवरून मलकापुर शहर पोलीस ठाण्यात कायमी गुन्हा क्रमांक 541/2026 अन्वये मोटार वाहन कायदा कलम 185 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शामानंद शिरसाट करीत आहेत.

## दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावरील कारवाईच्या निषेधार्थ जळगावत बंद यशस्वी..

प्रतिनिधी २४ जुलै



**जळगांव जामोद:** दिल्ली येथील जंतर-मंतरवर शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींवर झालेल्या कथित अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला जळगाव जामोद वंदना तालुक्यातील १०० टक्के प्रतिष्ठाने कडकडीत बंद ठेवून निषेध करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर जळगाव जामोद शहर व तालुक्यातील सर्व प्रतिष्ठान बंद ठेवून वंचित बहुजन आघाडीच्या व इतर समविचारी पक्षाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

आंदोलनकर्त्यांनी दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कारवाईचा तीव्र निषेध व्यक्त करत लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार अबाधित ठेवण्याची मागणी केली.त्यानंतर जळगाव जामोद येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली जळगाव जामोद तालुका बंद आंदोलनात समविचारी पक्षांनी सहभाग नोंदला यावेळी आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेचा निषेध व्यक्त करत विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी सर्वपक्षीय एकजूट आवश्यक असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले.

या आंदोलनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), मनसे,एमआयएम, समर्थन होते यावेळी प्रसेनजीत पाटील, डॉ.स्वाती वाकेकर, गजानन वाघ, दत्ता पाटील, देवांनंद दामोदर, सुनिल बोदडे, रतन नाईक, मोहित दामोदर,ईरफान खान, अमर पाचपोर, तुकाराम काळपांडे, भीमराव पाटील, आशिष वायझोडे, नासीरभाऊ, सैय्यद नफीझ, रमेश ताडे, डॉ. शोएब,यांच्यासह समविचारी पक्षाचे नेते व पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते या बंदमध्ये सहभागी होते युवक आघाडी महिला आघाडी सम्यक विद्यार्थी आंदोलन मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

## बंदच्या आवाहनाला खामगाव, नांदुरा, संग्रामपूर, जळगाव जामोदमध्ये व्यापारी, सामाजिक संघटनांचा प्रतिसाद

प्रतिनिधी २४ जुलै

**खामगाव :** दिल्ली येथे विद्यार्थ्यांना झालेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला गुरुवार, २३ जुलै रोजी खामगाव शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील व्यापारी, विविध सामाजिक संघटना व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग घेतल्याने प्रमुख बाजारपेठ दिवसभर बंद होती. यासोबतच अनेक शाळा व महाविद्यालयांनी सुट्टी जाहीर केली होती.

### शेगाव, मलकापुरात निषेध



सकाळपासूनच टॉवर चौक, मोहन टॉकीज चौक, फरशी चौक, सराफा बाजार, मुख्य बाजारपेठ तसेच इतर व्यावसायिक भागांतील दुकाने बंद असल्याचे चित्र पाहायला मिळाले. नेहमी वाहनांच्या आणि नागरिकांच्या गर्दीने गजबजलेले चौक गुरुवारी मात्र शांत दिसत होते. शाळा-महाविद्यालये बंद असल्याने विद्यार्थ्यांची नेहमीची वर्दळही पूर्णपणे गायब झाली होती. त्यामुळे शहरात सर्वत्र बंदचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत होता. बंद शांततेत पार पडावा, यासाठी पोलिस प्रशासनाने शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील परिसर आणि बाजारपेठांमध्ये कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता. दिवसभरात कोणताही अनुचित प्रकार न घडता बंद शांततेत पार पडला. वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संबंधित घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून, अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी कठोर पावले उचलावीत, अशी मागणी आंदोलनकांनी केली. बंदला विविध सामाजिक संघटना नागरिकांचाही नैतिक पाठिंबा लाभला. दरम्यान, रुग्णालये, औषधांची दुकाने व इतर अत्यावश्यक सेवा नियमित सुरू होत्या.

### बंददरम्यान पोलिसांचा कडेकोड बंदोबस्त

वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर घोषणाबाजी करून दिल्ली येथील घटनेचा निषेध व्यक्त केला. बंददरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा आणि संवेदनशील भागात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला.

## उधारीचे पैसे मागितल्याने तरुणाला मारहाण

प्रतिनिधी २४ जुलै

**खामगाव:** उधारीचे पैसे परत-मागितल्याच्या कारणावरून झालेल्या - वादात एका तरुणाला शिवीगाळ, - धक्काबुक्की करत लाकडी काठीने - मारहाण करण्यात आल्याची घटना खामगाव तालुक्यातील अटाळी येथे - घडली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण - पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

अटाळी येथील रहिवासी बजरंग नजरुसिंग काळे (२६) हे २२ जुलै रोजी रात्री ९:३० वाजताच्या सुमारास बलमा पुसद पवार याच्याकडे उधारीचे पैसे मागण्यासाठी गेले होते. यावेळी पैशांच्या कारणावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. वाद वाढताच आरोपीने शिवीगाळ करत धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याचवेळी कॅनवल पुसद पवार हा देखील घटनास्थळी आला. त्याने फिर्यादीला धक्काबुक्की करून शिवीगाळ केली त्यानंतर हातातील लाकडी काठीने डाव्या हातावर व पाठीवर वार करून दुखापत केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीच्या तक्रारीसह वैद्यकीय अहवालाच्या आधारे खामगाव ग्रामीण पोलिसांनी बलमा पुसद पवार व कॅनवल पुसद पवार या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५२, ३५१(२), ३५१ (३) व ३ (५) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार बाळकृष्ण फुंडकर करीत आहेत

## शहरातून काढली निषेध रॅली

### विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी वंचितने घेतला पुढाकार

प्रतिनिधी २४ जुलै



**खामगाव :** जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली दिल्ली पोलिसांकडून करण्यात आलेला लाठीचार्ज, अश्रुधूराचा वापर व अमानुष वागणूक ही लोकशाही मूल्यांना काळिमा फासणारी घटना आहे. या घटनेत अनेक विद्यार्थी, युवक व महिलांना गंभीर दुखापती झाल्या असून अनेक विद्यार्थ्यांचे डोके फुटले, हात-पाय फ्रॅक्चर झाले तसेच काही युवतींशी गैरवर्तन झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

या अमानुष घटनेच्या निषेधार्थ तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय्य लढ्याला पाठिंबा देण्यासाठी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा तसेच दोषी पोलिसावर कारवाई करावी यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंदच्या समर्थनार्थ मलकापूर शहरात बंद पुकारला होता त्या अनुषंगाने शहीद संजयसिंह राजपूत यांच्या स्मारकापासून रेल्वे स्टेशन जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक पर्यंत तालुकाध्यक्ष विजय झनके यांच्या नेतृत्वात तथा जिल्हा महासचिव अतिशभाई खराटे यांच्या मार्गदर्शनात शेकडो जनतेच्या उपस्थितीत शहरातून निषेध रॅली काढण्यात आली यावेळी स्थानिक दुकानदारांनी व्यापाऱ्यांनी याला समर्थन देत आपली दुकाने, प्रतिष्ठाने बंद ठेवली तसेच विविध समविचारी राजकीय पक्ष सामाजिक संघटनेने सामील होत पाठींबा दिला याप्रसंगी निषेधाचे निवेदन महामहीम राष्ट्रपती यांना मलकापूर तहसीलदार मार्फत देण्यात आले. याप्रसंगी वंचितचे जि. संघटक भाऊराव उमाळे, जी.उपाध्यक्ष यशवंत कळासे, , धम्मपाल उमाळे, यासीन कुरेशी, राजुभाऊ शेगोकार, महिला अध्यक्षा पौर्णिमा इंगळे, दीपमाला इंगळे, भिमराव ससाणे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे व विविध पक्ष संघटनाचे पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते

## खामगांव अर्बन बँकेत टि.डि.एस. बाबत कर्मचाऱ्यांची कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी २४ जुलै



**खामगाव:** . १५ जुलै २०२६ रोजी सहकार क्षेत्रातील अग्रगण्य खामगांव अर्बन बँकेच्या मुख्य कार्यालयास नागपूर विभागाच्या आयकर अधिकारी श्रवणकुमार व धर्मेन्द्रकुमार झा व त्यांच्या टिमने ग्राहकांचे व्यवसायातील व्यवहाराबाबतच्या रिपोर्टबाबत तपासणी संदर्भात भेट दिली असता या भेटीदरम्यान दि. १६ जुलै रोजी मुख्य कार्यालयातील माधव सभागृहात खामगांव अर्बन बँकेच्या अधिकारी व कर्मचारी यांना-को-ऑप. बँकांसाठी महत्वपुर्ण अशा टि.डि.एस. कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. धर्मेन्द्रकुमार झा व श्रवणकुमार यांनी टि. डि. एस. कायद्यात झालेल्या सुधारणांची सविस्तर माहिती दिली तसेच बँकेच्या उपस्थित अधिकाऱ्यांनी विचारलेल्या शंकाचे निरसन करून निराकरण केले. याप्रसंगी खामगांव अर्बन बँकेच्यावतीने अध्यक्ष प्रा. डॉ. विजयजी पुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वरजी जाधव व वरिष्ठ अधिकारी यांनी आयकर अधिकारी व त्यांच्या टिमचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. आयकर अधिकारी श्रवणकुमार यांनी बँकेतील व्यवहार होताना पुढील गोष्टीची काळजी घेण्याचे मार्गदर्शन केले- (१) डाटा प्युरिटी अथवा डाटा क्लिनींग exercises व्यवस्थीत करा, (२) मल्टीपल युसीआयसी असता कामा नये. (३) पॅन नंबर चुकीचे टाकणे, अपडेट करतांना, त्यात बदल करताना कंपनीचा पॅन न टाकता POA किंवा Non-individual accounts च्या बाबतीत वैयक्तीक पॅन टाकणे. यामुळे डाटा चुकीचा मिळतो. (४) जे रिटर्न/ Dump, SFT रिटर्न इत्यादीची टेकनिकल दृष्टीने तपासणी करावी व तदनंतरच दाखल करावे. वरील सुचनांप्रमाणे बँकेने सॉफ्टवेअर संदर्भात अडचण सांगीतली असता मा. अधिकाऱ्यांनी सॉफ्टवेअर प्रोव्हाईड करणाऱ्या कंपनीस सुचना देऊन डाटा व्यवस्थित करून देण्याची सुचना केली. त्यानुसार बँकेने डाटा अपडेट करण्याचे काम सुरु केले अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली व आयकर अधिकारी व त्यांच्या टिमचे आभार मानले.

# आषाढी एकादशीचा भक्तिरंग

## शहरात होणार विठ्ठल भक्तीचा जागर

प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला :** आषाढी एकादशीनिमित्त शनिवारी (दि. २५) शहरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे. विविध मंदिरांमध्ये पहाटेपासून रात्रीपर्यंत अभिषेक, महाआरती, हरिपाठ, कीर्तन, दिंडी सोहळे, अभंगवाणी आणि प्रसाद वितरणाचे आयोजन केले असून, भाविकांसाठी दर्शनाची विशेष व्यवस्था केली आहे. जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले व प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणारे जुने शहर येथील 322 वर्षे पुरातन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे यंदाचे हे 93 वे वर्ष आहे . यंदा गाभाऱ्यात श्री विठ्ठल-रुखमाईचे दर्शन आणि विशेष फुलांची सजावट राहील. आषाढी एकादशीला पहाटे चार वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी यांच्या मूर्तीची षोडशोपचार पूजा व अभिषेक मंडळाचे सर्व सेवाधिकारी श्रीकृष्ण गोवर्धन शर्मा व अर्चना शर्मा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे आषाढ पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी 30 जुलै रोजी सकाळी गोपाळकाला कीर्तन व दहीहंडीचा कार्यक्रम होणार आहे या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या सर्व सेवाधिकाऱ्यांनी केले आहे.



### शनिवारी होणार गजर माऊलीचा

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त गजर माऊलीचा या विशेष भक्ती संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे शनिवार 24 जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजता प्रमिलाताई ओक हॉल येथे हा कार्यक्रम रंगणार आहे वारकरी संप्रदायाची अखंड भक्तीपरंपरा संतांच्या अभंगाचे अध्यात्मिक चिंतन आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजरातून भक्ती भाग जागवणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी एक आभाळ वेगळा सांस्कृतिक अनुभव ठरणार आहे संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, आदी संतांच्या विचाराचा आणि विठ्ठल भक्तीच्या समृद्ध वारशाचा सुरेल आविष्कार या कार्यक्रमातून सादर केला जाणार आहे

### शहरात श्री क्षेत्र संकेश्वर चे शंकर भारती महाराज यांची उपस्थिती

जुन्या शहरातील श्री विठ्ठल मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाची विधिवत सुरुवात झाली आहे तसेच 23 जुलै रोजी श्री क्षेत्र संकेश्वर येथील परमपूज्य शंकर भारती महाराज यांचे सायंकाळी पाच वाजता मंदिरात दर्शणार्थ आगमन होणार असून त्यांचे हस्ते आशीर्वाचन सोहळा पार पडणार आहे तसेच मंडळाला सहकार्य करणारे सामाजिक धार्मिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांना महाराजांच्या हास्य आशीर्वाद देण्यात येणार आहे तरी सर्व विठ्ठल भक्तांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे अशी विनंती व्यवस्थापक रमेश अलकरी यांनी केली आहे

# मोफत धान्यावर केंद्राच्या मिशन सुधारची नजर

## आतापर्यंत दहा हजार 842 लाभार्थ्यांची पडताळणी

प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला:** मोफत धान्य पात्र लाभार्थ्यांनाच मिळावे, धान्य वितरणातील काळाबाजार थांबावा यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या 'मिशन सुधार' अंतर्गत अकोला जिल्ह्यातील 10 842 लाभार्थी सदस्यांची पडताळणी करण्यात आली आहे.

पुढील कार्यवाहीत अपात्र लाभार्थींना बाहेरचा रस्ता दाखवला जाणार आहे. मात्र, त्यापूर्वी पडताळणी झालेल्यांचे म्हणणे जाणून घेतले जाईल. राज्यात अंत्योदय व प्राधान्य गटातील शिधापत्रिकांवर मोफत धान्य दिले जाते. मात्र, यातील काही शिधापत्रिकाधारक या योजनांसाठी पात्र नाहीत. जास्त आर्थिक उत्पन्न, पेन्शन, चारचाकी असूनदेखील काही कुटुंबे धान्य योजनेचा लाभ घेत आहेत.

अंत्योदय अन्न योजना लाभार्थ्यांना शिधापत्रिकेवर दर महिना 35 किलो धान्य मिळते तसेच प्राधान्य कुटुंब योजनेत लाभार्थ्यांना दरमहा 5 किलो धान्य मिळते.

परंतु या योजनेसाठी जे लाभार्थी पात्र नाहीत किंवा दुबार नोंदणी झालेल्या अशा शिधापत्रिका वगळण्यासाठी एप्रिल २०२६ पासून मिशन सुधार योजना सुरू केली आहे. यात राज्यातील सर्व जिल्ह्यांना अशा शिधापत्रिका तालुकानिहाय यादी पाठवून पडताळणी करण्यास सांगितले. त्यानुसार जिल्हा पुरवठा कार्यालयतर्फे शिधापत्रिकांची पडताळणी सुरू आहे. आतापर्यंत 10,842 लाभार्थी सदस्यांची पडताळणी करण्यात आली आहे. त्यामध्ये अकोला शहर 3632 ,अकोला ग्रामीण 769, मुर्तीजापुर 1441, अकोट 1112, तेल्हारा 914, पातुर 1142, बाळापुर 1076 तर बार्शीटाकळी 856 शिधापत्रिका धारकांचा समावेश आहे.




### मोफत धान्य घेणाऱ्या अपात्र कार्ड धारकांवर कारवाईची टांगती तलवार

जिल्ह्यात १०८४ लाभार्थी सदस्यांची पडताळणा करण्यात आली आहे. जे या योजनेसाठी पात्र नाही, ज्यांचे आर्थिक उत्पन्न जास्त आहे पेन्शन धारक, चार चाकी असणारे या सर्वांवर कारवाईची टांगती तलवार लटकलेली असल्याने यांची चिंता वाढली आहे.

# अकोला-पंढरपूर आषाढी वारीसाठी भाविक रवाना



प्रतिनिधी २४ जुलै

अकोला : आषाढी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने आज, शुक्रवार २४ जुलै रोजी अकोला ते पंढरपूर दरम्यान विशेष रेल्वेचे प्रस्थान झाले. वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. परतीच्या प्रवासात पंढरपूर-अकोला विशेष २५ जुलै रोजी दुपारी ३.५० वाजता पंढरपूर येथून सुटून २६ जुलै रोजी सायंकाळी ४.५० वाजता अकोला येथे पोहोचणार आहे. या विशेष गाडीमध्ये १८ शयनयान (स्लीपर), २ सामान्य द्वितीय श्रेणी डबे आणि २ सामान-सह-गार्ड ब्रेकव्हॅन, अशी एकूण २२ डब्यांची रचना करण्यात आली आहे. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन पुरेशी आसन क्षमता उपलब्ध करून देण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना आगाऊ आरक्षण करण्याचे आवाहन केले असून, तिकीट बुकिंगसाठी रेलवन ॲपचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे. तसेच गाडीचे सविस्तर वेळापत्रक, थांबे आणि अद्ययावत माहिती जाणून घेण्यासाठी एनटीईसी ॲप किंवा रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा, असेही रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त 25 जुलै रोजी श्री श्यामबाबा पालखी व निशाण यात्रा

प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त ओल्ड सिटी ग्रुपच्या वतीने शनिवार, २५ जुलै रोजी भव्य श्री श्यामबाबा पालखी व निशाण (ध्वज) यात्रा आयोजित करण्यात आली आहे. ही यात्रा सकाळी ७.३० वाजता डाबकी रोड येथील श्री गजानन महाराज मंदिरातून प्रारंभ होणार आहे. यात्रेत आकर्षक सजविलेल्या पालखीत श्री श्यामबाबांची मनोहारी मूर्ती विराजमान असेल. शेकडो श्यामभक्त हातात निशाण घेऊन "हारे का सहारा, बाबा श्याम हमारा"च्या जयघोषात नगरप्रदक्षिणा करणार आहेत. मार्गभर भजन-कीर्तन, पुष्पवृष्टी तसेच विविध ठिकाणी भक्तांकडून पालखीचे स्वागत करण्यात येणार आहे. या भव्य पालखी व निशाण यात्रेत शहरासह परिसरातील सर्व श्यामभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्री श्यामबाबांचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन आयोजक ओल्ड सिटी ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे. या यात्रेमुळे संपूर्ण राजराजेश्वर नगरी भक्तिमय व श्याममय वातावरणाने दुमदुमून जाणार आहे.

### श्याम भक्तांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

# सनसाइझ कीड्स स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त कार्यक्रम




**अकोला:** गायत्री नगरातील सनसाइझ कीड्स स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी संतांची वेशभूषा केली होती. भक्तिमय वातावरण तयार झाले होते. आज 24/07/2026 रोजी सकाळी 9.30 वाजता कार्यक्रम साजरा करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक, पालक आंनदाने सहभागी झाले. हा कार्यक्रम शाळेतील शिक्षिका आरती देशमुख, हर्षा निंबोकार, सोळंके मॅडम, शालिनीताई मोरे यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

# जवान सुशील तेलगोटे खून प्रकरणाची सुनावणी फास्ट ट्रॅक कोर्टात करा

प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला :** देशाच्या सीमेवर सेवा बजावणारे अकोला तालुक्यातील अकोली बुद्रुक येथील भारतीय लष्कराचे जवान सुशील दिलीप तेलगोटे यांच्या अत्यंत निघृण खून प्रकरणाची सुनावणी जलदगती न्यायालयात चालवावी आणि या खटल्यात प्रसिद्ध विधिज्ञ ॲड वकील म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) जिल्ह्याच्या वतीने मुख्यमंत्री यांच्याकडे अकोला जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.भारतीय लष्करात कार्यरत अकोला शहरातील सुशील दिलीप तेलगोटे यांना, गोलू उर्फ यशवंत गणेश ठाकूर (27), जय विनोद मुरेकर (22), नीलेश धुमाजी सोलापुरे (42) आणि अंकित उर्फ छोटू विठ्ठल खंडारे (24) रा. सर्व अकोली बु. यांनी 24 मार्च 2026 रोजी रात्री 8.30 वाजतादरम्यान मृतक सुशील दिलीप तेलगोटे यांना फोन करून बोलावले आणि त्यानंतर त्याला लाकडी राफ्टरने जबर मारहाण केली. यामध्ये जवान सुशील तेलगोटे गंभीर जखमी झाले. गंभीर अवस्थेत सुशील तेलगोटे गावाशेजारील स्मशानभूमीजवळ पडलेले असल्याची माहिती मिळाली, त्यावरून मृतक सुशील तेलगोटेचे वडील आणि मामांनी सुशीलला खासगी रुग्णालयात दाखल केले, उपचारादरम्यान 27 मार्चला सायंकाळी 8 वाजतादरम्यान सुशील तेलगोटेचा मृत्यू झाला होता. या गुन्ह्यात अकोला पोलिसांनी नमूद चारही आरोपींना अटक केली होती.

या निवेदनावर, रिपाइं जिल्हाध्यक्ष सुनील अवचार, मृतक सुशील तेलगोटे यांचे वडील दिलीप तेलगोटे, उपेंद्र गवई, मनोज इंगळे, सागर जामनिक, दीपक गोमाजी गोपनारायण, पंडित सदार, विजय इंगळे, भारत गवारगुरु, वैभव गोपनारायण यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची नमो उद्यान प्रकल्पाला भेट

प्रतिनिधी २४ जुलै

**हिवरखेड :** जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी 21 जुलै रोजी भर पावसात येथे भेट देऊन स्थानिक सदाशिव संस्थान येथील नमो उद्यान या प्रकल्पाचे पाहणी करून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेतले. हिवरखेड नगरपरिषद कडून मंजूर झालेल्या नमो उद्यान या अंदाजे एक कोटी रुपयाच्या प्रकल्पाचे काम सदाशिव संस्थान येथे प्रगतीपथावर असून सदर कामाची पाहणी करून जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी समाधान व्यक्त केले यावेळी जिल्हाधिकारी यांच्यासोबत हिवरखेड नगर परिषदेच्या नगराध्यक्ष सुलभा दुतोंडे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतीश गावंडे, रमेश दुतोंडे, तहसीलदार महेश रामगुंडे ,उपाध्यक्ष प्रतिभा येऊल, गटानेत्या वैशाली वानखडे, सभापती वंदना वानखडे, प्रमिला मानकर, अजित खान, वैभव गावंडे, उपसभापती अनिता वाकोडे, नगरसेविका दिपाली इंगळे,नगरसेवक दीपक रायबोले, प्रथमेश नाठे, दानिश खान किरण शेदानी, माजी सरपंच संदीप इंगळे, भाजपा युवा मोर्चाचे शहराध्यक्ष सुदाम राऊत, राजेश वानखडे, रवींद्र वाकोडे, शासकीय कंत्राटदार सुरेश नाठे, इंजिनीयर आकाश वाघ, मोहसीन ठेकेदार यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.



# उड्डाण पुलावर मुलाचा मृतदेह आढळला; मृत्यूचे कारण अस्पष्ट



प्रतिनिधी २४ जुलै

महागाव (यवतमाळ) : महागाव–कलगाव मार्गावरील उड्डाण पुलावर गुरुवारी सकाळी १७ वर्षीय मुलाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. अनिल गजानन राठोड (वय १७) असे मृत मुलाचे नाव असून, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. स्थानिक नागरिकांनी उड्डाण पुलावर एका मुलाचा मृतदेह पडून असल्याची माहिती महागाव पोलिसांना दिली. त्यानंतर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. प्राथमिक तपासात मृत्यूमागील कारण स्पष्ट झाले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण समोर येईल, असेही पोलिसांनी नमूद केले आहे. या घटनेमुळे महागाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पोलिसांकडून अपघात, आत्महत्या किंवा अन्य कोणत्याही शक्यतेच्या अनुषंगाने सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. मृताच्या नातेवाइकांशी संपर्क साधून तसेच घटनास्थळ परिसरातील उपलब्ध माहितीच्या आधारे पुढील चौकशी केली जात आहे.

# २१४ ग्रॅम. मॅफेड्रान अमली पदार्थासह आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २४ जुलै

**अमरावती :** २१४ ग्रॅम. (०.२१४ किलो ग्रॅम) मॅफेड्रान (एम.डी.) अमली पदार्थ सह एका आरोपीस ताब्यात घेण्यात आली असूनही कारवाई . गुन्हे शाखा युनिट 1 ने यशस्वी केली आहे. रेकॉर्ड वरील एक गुन्हेगार पाटीपूरा, अमरावती येथे त्याचे चार चाकी लाल रंगाची स्विफट गाडी कमांक MH 40/CA/2191 मध्ये बसून मेफेडान (एम.डी) नावाचा अमलीपदार्थ बाळगून विकी करीता ताजनगर परिसरात येणार आहे', अशा गोपनिय व खात्रीशीर माहितीवरुन दिनांक २२/०७/२०२६ रोजी गुन्हेशाखा, अमरावती शहरचे अधिकारी व अंमलदार यांनी पो.स्टे. नागपूरीगेट हद्दीत पाटीपूरा, अमरावती येथे सईद खान शरीफ खान, वय ४१ वर्षे, रा पाटीपूरा, अमरावती याचे अंगझडती झडतीमध्ये ०.२१४ किलो ग्रॅम मेफेड्रान (एम.डी.) नावाचा अंमलीपदार्थ मिळून आला. सदर अंमलीपदार्थ हा विक्रीकरीता बाळगत असल्याची कबुली दिल्याने आरोपी कडुन जप्त करण्यात आला आहे. वरुन पो.स्टे. नागपूरी गेट येथे कलम ८ (क), २१ (क) २२ (क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हानोंद करण्यात आला आहे. आरोपी चे ताब्यातुन एका झीपलॅक प्लास्टिक पाउच ज्यामध्ये पांढ-या/भुरकट रंगाचा एमडी नावाचा अंमली पदार्थ २१४ ग्रॅम. (०.२१४ किलो ग्रॅम) कि.अं. ४२,८०,०००/-. एक लाल रंगाची चार चाकी स्विफट गाडी क्रमांक MH/40 CA/2191 कि.अं. ८,००,०००/-.,एक Vivo कंपनीचा, काळया रंगाचा ॲण्ड्राईड मोबाइल कि.अं. १५,०००/- ., एक Jio Bharat कंपनीचा निळ्या रंगाचा की-पॅड मोबाईल कि. अं.२,०००/- रू. ,एक Jio Bharat कंपनीचा काळया रंगाचा की पॅड मोबाईल कि.अं.२,०००/- एकुण किंमत ५०,९९,०००/- रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी चे नाव -सईद खान शरीफ खान, वय ४१ वर्षे, रा पाटीपूरा, अमरावती असे आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त, राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ- ०१), प्रांजली सोनवने, पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) कैलाश पुंडकर, तसेच सहायक पोलीस आयुक्त, (गाडगेनगर विभाग) . ब्राम्हे सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. दिनेश दहातोंडे, पो.नि. अतुल वर, सपोनि मनीष वाकोडे, सपोनि दशरथ आडे, सहा. पोउपनि फिरोज खान, पोहेका संभाजी केंद्रे, पोहवा मंगेश लोखंडे, पो.हे.कॉ. नाझीमउददीन सैयद, पोलीस अमलदार रंजित गावंडे, नरेश मोहरिल, सुरज चव्हाण, निखील गेडाम, सागर ठाकरे, म.पो. शी. वर्षा घोंगडे, चालक नरेद्रं बुरंगे, प्रभात पोकळे, पो.हे.कॉ. सुधिर गुढधे गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी केलेली आहे.



# देवा भाऊंच्या वाढदिवसानिमित्त अकोला जिल्हा ग्रामीणमध्ये 748 जणांचे रक्तदान

प्रतिनिधी २४ जुलै

**अकोला.** राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पावसातही 748 रक्तदात्यांनी केले रक्तदान. हा उपक्रम युवकांच्या देशभक्तीचा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रतीक ठरला. जिल्ह्यातील 927 गावांमध्ये देवा भाऊंच्या दीर्घायुष्यासाठी महाआरती व दीपदान करण्यात आले. वारकरी मातृशक्तीचा विशेष सन्मान करण्यात आला. सामान्य नागरिकांना दिलासा देणाऱ्या या निर्णयाअंतर्गत अकोला महानगर आणि ग्रामीण भागातील 6924 महिला, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिकांना ST स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. महिलांना शेतीत स्वावलंबी करण्यासाठी *8000 महिलांना "कृषी माऊली किट" चे वाटप करण्यात आले. यामुळे प्रत्येक घरात हिरवळ आणि विषमुक्त भाजीचा संकल्प पूर्ण होणार आहे. रक्तदान, वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, स्वच्छता अभियान यांसारखे 56 प्रकारचे सेवा उपक्रम या सेवा सप्ताहात जिल्हाभर सातत्याने राबविण्यात येत आहेत. या भव्य उपक्रमाचे आयोजन जिल्ह्याचे लोकप्रिय नेते आमदार रणधीर भाऊ सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, महानगर जिल्हाध्यक्ष जयंत मसने, विजय अग्रवाल, किशोर पाटील, योगेश गोतमारे, सौ. जयश्री पुंडकर, सौ. वैशालीताई शेळके, सौ. चंदाताई शर्मा, सौ. वैशालीताई निकम, कृष्णा चव्हाण, पवन महल्ले, महापौर सौ. शारदाताई खेडकर, उपमहापौर अमोल गोगे, सौ. वैशालीताई पालीवाल, सौ. सुलभाताई दुतोंडे, हर्षद साबळे, सौ. मायाताई घुले, माधव मानकर, अंबादास उमाळे, सिद्धार्थ शर्मा, ॲड. देवाशिष काकड, संजय गोटफोडे, सौ. आम्रपाली पर्वत, ॲड. सौ. रूपाली काकडे, राजेश नागमते, मनीष गावंडे, प्रवीण हगवणे, नितेश पाली, राजेंद्र गिरी, संदीप गावंडे, तुषार भिरड, अमोल गीते, गोपाल मुळे, किशोर कुचके, गणेश लोड, कपिल खरप,रविकांत राऊत, प्रशांत ठाकरे, हरीश टावरी, संकेत राठोड, शेरू भाई, गोपाल गाडगे, गोपाल मोहोड, वैभव पोटे, गणेश रोटे, नंदकिशोर राऊत, डॉ. अमित कावरे, गिरीश जोशी,रमेश आप्पा खोपरे, चंद्रकांत अंधारे, वेंकट ढोरे, प्रशांत अवचार यांच्यासह सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते या उपक्रमात सहभागी झाले.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135